संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

आपली निशाणी
तुतारी वाजविणारा माणूस

ते राजेशाही जगतात अन् मी लोकशाही साठी लढतोय...!

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) । काँग्रेस । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

अ. क्रमांक	उमेदवाराचे नाव	फोटो	निशाणी
१	**अभिषेक बाळासाहेब कळमकर** Abhishek Balasaheb Kalamkar		

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.

प्रकाशक : जिल्हा मालमत्ता, अ.नगर शहर विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)

JANASAMVAD MEDIA

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १४.११.२०२४ | अंक नं. २१४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!

विश्वसनीय रसवंतीची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर
अ. नगर
नारायणगाव
श्रीरामपूर

सावेडी, नगर-मनमाड रोडटच बिल्डींग भाड्याने देणे आहे
१०००० स्क्वे.फूट
हॉस्पीटल, हॉटेल, मॉल,क्लासेससाठी उपयुक्त अशी बिल्डींग
प्रशस्त पार्किंग सुविधांसह
: संपर्क :
Mo. 9404717371

संत श्री गुरुनानक
यांच्या जयंती निमित्त
त्यांच्या चरणी विनम्र
कोटी कोटी प्रणाम
मा.श्री. अविनाश देडगांवकर
श्री गुरुनानक समाजरत्न पुरस्कार विजेते
समाजसेवक, अहिल्यानगर

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रेनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग
9590151515 I 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA TILES-BATHWARE | KERAKOLL The Colouring Company | GLOSSY Sanitaryware | colorlite | NIRALI BG | RAK | ICON

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहमदनगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

दंतरोग मोफत तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबीर
शनिवार - दि. १६-११-२०२४ * वेळ : सकाळी १० ते २

मेटलकॅप	सिरॅमिक कॅप	रुट कॅनल	दात साफ करणे (Scaling)
1000/-	1500/-, 2500/-	2000/- ते 3000/-	500/- पासुन पुढे..

दातांची कवळी बसवणे - (3 Types Denture)
8,000/-, 10,000/-,14,000/

दातामध्ये सिमेंट भरणे 500/- पासुन पुढे..
इम्प्लांट 13500/- पासून सुरु

तज्ञ डॉक्टर
डॉ. अर्पणा पवार
डॉ. प्राची गांधी,
डॉ. स्वराज ठोले (ओरल सर्जन)

दातांच्या समस्या असल्यास आजच संपर्क साधा
9404472199

नांव नोंदणी आवश्यक * औषध खर्च वेगळा

हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.

24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक

डिजिटल एक्सरे	सोनोग्राफी	सिटीस्कॅन	एम.आर.आय.
रू. 250/-	रू. 800/-	रू. 1250/-	रू. 2500/-

शुन्यातून विश्व निर्मुनी,
किर्ती सुगंधाचा वृक्ष फुलवूनी
लोभ, माया, प्रिती, देवूनी
सर्वांची मने जिंकूनी,
सत्य सचोटीचा मार्ग देवूनी,
अमर जाहला आपण जीवनी
स्मृतीत दडल्या अनंत आठवणी!

आपल्या पावन स्मृतिस
भावपूर्ण **श्रध्दांजली**

स्व. देवेंद्र रभाजीराव कवडे
जन्म- दि. ०९/०३/१९४८ मृत्यु- दि. ०६/११/२०२४

॥ दशक्रिया विधी ॥
शुक्रवार दिनांक १५/११/२०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता अमरधाम, नालेगांव, अहिल्यानगर या ठिकाणी होईल.
समाज परिवर्तनकार ह.भ.प.डॉ. **सुनिल गंधे** महाराज सरपंच आरोग्य ग्राम, जखणगांव यांचे किर्तन होईल.

* शोकाकुल *
हरिभाऊ लक्ष्मण कर्डीले
मा. सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती
व मित्र मंडळ, अहिल्यानगर.

अनुक्रमांक **४** | चिन्ह - घड्याळ

विकासकामांवर माझा भर बदलत आहे आपलं नगर

माऊली संकुल ते जिल्हाधिकारी कार्यालय रस्ता ते छत्रपती संभाजी नगर रस्ता

याशिवाय संपूर्ण नगरमध्ये काँक्रीट रस्त्यांची बहुतांश कामे पूर्ण तर काही प्रगतीपथावर !

विश्वास जुना
संग्रामभैय्या पुन्हा

आपलं मत नगरला..
आपलं मत संग्रामभैय्यांना..

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी । भाजपा । शिवसेना | आर. पी. आय. (ए) | पी.आर. पी. | जनता दल (सेक्युलर) | अखिल भारतीय मराठा महासंघ | संस्थापक लहूजी शक्ती सेना रयत क्रांती संघटना | जय मल्हार क्रांती संघटना | दलित पँथर | युनायटेड रिपब्लिकन पार्टी पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार

अ. क्र.	उमेदवाराचे नाव	फोटो	चिन्ह - घड्याळ
४	**संग्राम अरुणकाका जगताप**		

नगरच्या अखंड विकासासाठी 'घड्याळ' चिन्हासमोरील बटन दाबून कार्यशील आमदार संग्राम अरुणकाका जगताप यांना प्रचंड बहुमतांनी विजयी करावे, ही विनंती.

मतदान : सुधवार, दि. २० नोव्हेंबर २०२४ । वेळ: सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० प्रकाशक- श्री. संपादकाचा बारकर, शहर जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

भारतीय निवडणूक आयोगाने अजित अनंतराव पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 'घड्याळ' हे चिन्ह दिले आहे. हे प्रकाशन सध्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायप्रविष्ट आहे. अंतरिम आदेशानुसार माननीय सर्वोच्च न्यायालयाने मंजूरलेली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आगामी सर्व निवडणुकांसाठी 'घड्याळ' हे निवडणूक चिन्ह सारस्पर्धासी परवानगी दिली आहे.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्षे जगण्यापेक्षा निर्मिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – के.आचार्य गुंडेचा

email - navamaratha@gmail.com

विकसित भारत साध्य करण्यासाठी...

ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित रानडे यांच्या लेखातून भारताच्या विकासाबद्दल लेख वाचण्यात आला होता त्याप्रमाणे भारत आणि भारतातील लोक विकसित देशांच्या श्रेणीत असल्याचे म्हणायचे असेल तर तीन निकष पाहावे लागतील.

पहिले म्हणजे प्रत्येक घरात नळाद्वारे स्वच्छ पाण्याची उपलब्धता. दुसरे म्हणजे स्थानिक सरकारी शाळांची गुणवत्ता. तिसरा मोठा निकष म्हणजे सार्वजनिक वाहतुकीचा वापर. यासोरीज हवेची गुणवत्ता, कामगारांची उत्पादन क्षमता, आरोग्य स्थिती, जेष्ठांची देखभाल, बगळेत्र, कमी उत्सर्जन, जैववविविधता हे देखील निकष आहेत.

या जोडीला पुढील २५ वर्षात ३० हजार डॉलरपेक्षा अधिक दरडोई उत्पन्नांतर्गत पोहोचता येईल का याचाही विचार करावा लागेल.

२००२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्रद्धेय अटजींनी २०२० पर्यंत विकसित देश करण्याची घोषणा केली होती. थोर शास्त्रज्ञ व देशप्रेमी डॉ. अब्दुल कलाम हे तर या ध्येयप्राप्ती अक्षरपर्यंत समर्पित होते. त्यांचे हे ध्येय कृषी, आरोग्य, शिक्षण, सेवा, पायाभूत सुविधा आणि माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित व्यापक कार्य योजनेशी संबंधित हते व आहे. आज दिसत आलेला आकार त्याचेच फळ आहे. या आकाराला मोहोर आणून खरोखरीची 'विकसित' फळे देशाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासनक, प्रशासक, तुम्हा आम्हाला कार्यरत रहावे लागेल. महाराष्ट्राचा वाटा उचलण्यासाठी, योग्य प्रतिनिधी निवडण्यासाठी योग्य निर्णय घेणे आपल्याच हाती आहे. त्यासाठी मतदान कराच व इतरांनाही सांगा.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"–९८२२०२०६९१

अंपे रिक्षामधून अवैध दारू वाहतूक करणाऱ्यांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

फक्त पाव्हण्याचा मेव्हणा आणि मेहुण्याचा पाहुणा नको..

मतदार बंधू आणि भगिनींनो..

समाजीकडे निवडणुकीचं वातावरण तापलं आहे पेटलं आहे.. विशेष करून धाब्यांवर हॉटेलमध्ये तर जास्तच तापलं आहे.. त्यामुळे नगरमध्ये थंडी देखील जरा कमीच जाणवते आहे..

आपले अहमदनगर शहर ऐतिहासिक आहे हे कबूल आहे, म्हणून काय त्याला कायम ऐतिहासिक ठेवायचं का? आता तर त्याचं अधिकृत नाव बदललं अहिल्यानगर झालं.. पण ज्या मागसाच्या तोंडावर कायम केविलवाणा आणि सुरकुतलेले भाव असतात अशा मागसाचं नाव नुसतच त्याला बळजबरी पाळण्यात झोपवून उलहास टेवून काय उपयोग होतो का? त्याच्यामध्ये मूलभूत फरक झाला पाहिजे ना

गेल्या कित्येक वर्षापासून दूरदृष्टी नसलेल्या अभ्यास नसलेल्या अशा काही नशिबाने निवडून आलेल्या उमेदवारांमुळे हे शहर वर्षानुर्वष कासव गतीने देखील विकास न होता.. जसे होते तसेच वेडद्यावाकड्या अरुंद गल्लीबोळांनी संपन्न. .गलिच्छ आणि विशेष म्हणजे अतिक्रमणांनी युक्त.. मग्र अवस्थेमध्ये राहायचा देखील एक वेगळाच इतिहास निर्माण झाला आहे.. मोठी गल्ही, घास गल्ही, गंज बाजार याची घाणेरडेपणाची दखल तर साक्षात ग्रिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेतली जावी इतकी खराब आहे वर्षानु वर्ष.. पण मतांचे राजकारण आणि लागेबांचे या गावठाणाच्या कधी विकास व्हावा असं कुणालाच वाटलं नाही.. म्हणून शहरातले सगळे चांगली दुकाने उद्योगधंदे उपनगरात स्थलांतरित झाले..

आपण सगळे मात्र अंग चोरून सर्कशीतल्या एखाद्या कसलेल्या कलाकारांना लाजवील अशा पद्धतीने आजही गाडी त्या गल्ही मधल्या अतिक्रमणांमधून कशीबशी बाहेर काढून रोज ऑल इज वेल असा आपल्या मनाला समजावून आपले दिवस काढत आहोत.. इथली आपल्या आजूबाजूची परिस्थिती बदलण्यापेक्षा आपणच बदलावे असा सोयीस्कर विचार आपण करून बहुसंख्य लोक आजूबाजूच्या शहरांमध्ये स्थलांतरित झाले, आणि अहमदनगर हे रिटायर्ड पेन्शनरांचे, बापजाद्यांची या शहरात इस्टेट आहे म्हणून कही ही न करता याच्या उखाड्या पाखड्या काढून त्याच्या घरात डोकावून पहा असं दिवसभर कसन त्याचं भाडं खाणाऱ्या निरुद्योगी टोण्ग्यांचे शहर बनले आहे. तरीपण आपण वारंवार बोटाला काळी शाई लावून त्याच चुका प्रत्येक पाच वर्षांनी करत आहोत.

मराठीमध्ये एक म्हण आहे.. उडदा माजी काय निवडावे काळे गोरे म्हणजे उडीद हे सगळे काळेच असतात पण त्याच्यातून काळे गोरे कसे काय निवडायचे? असा यक्ष प्रश्न सगळ्यांना राजकारणातल्या उमेदवारांबाबत पडलेला असतो. मग आपण दगडापेक्षा वीट मऊ हा नियम लावून जो उमेदवार सभ्य सुजाण धर्मनिरपेक्ष सुशिक्षित आणि सुसंस्कृत वाटेल, त्यालाच मतदान करायला हवे ना? मग त्यावेळी त्याचा डामडौल किती आहे? किती भाडखाने मागसं आणून किती मोठी रॅली काढली होती? किती लोकांना धाब्यावर रोज पार्टया खाऊ घालतो? कोणत्या धर्माचा आहे? कोणत्या पक्षाचा आहे? यापेकी कुठल्याही मोहोचं आकर्षण आपल्यासारख्या सुजान नागरिकांना पूर्ण नये ..

पात्रतेचा निकष एकच असतो .. त्या उमेदवाराचा अभ्यासदौरा तो कुठला पदाधिकारी असो किंवा नसो तरीपण छोट्या–मोठ्या पातळीवर का होईना काम करण्याबाबत आलेला त्याचा अनुभव.. त्याचा अभ्यास.. त्याची दूरदृष्टी.. त्याची कार्यक्षमता.. त्याची विश्वासार्हता.. नगर शहरासाठी त्याने तळमळीने केलेलं काही काम जे प्रत्यक्ष डोळ्याला दिसत आहे कि नाही.. की आता तो नुसतीच निवडणूक आली म्हणून जमिनीतून उगवलेल्या भूछत्रासारखा अचानक समोर आलाय आणि मी हे करीन.. मी ते करीन असे तोंडे तोडतो आहे.

योग्य उमेदवार, मतदार जागृती अभियान...

नुसती आश्वासनं नको

आज रोख उद्या उधार या वाक्यासारखे आश्वासनांचे गाजर नको.. कारण तो उद्या नावाचा दिवस कधी येतच नसतो. आपल्या जातीचा.. पाहुण्याचा मेव्हणा.. मेहुण्याचा पाहुणा.. असल्या फालतू आत्मकेंद्रित भूमिकेतून बाहेर पडल्याशिवाय पोकळ नैतिकतेच्या आणि आदर्शाच्या गप्पा झोडण्याचा आपल्याला कही अधिकार नाही, आपणच आहोत आपल्या भविष्याचे शिल्पकार!

आपण जन्माला येतो तेव्हा मातृ ऋण, पितृ ऋण, गुरु ऋण, आणि समाजऋण असे चार ऋण डोक्यावर घेऊनच जन्माला आलेलो असतो.. त्या ऋणांपेकी कुठले ऋण आपण जमेल तसे थोडेफार का होईना फेडतो? याचाही जरा विचार केला पाहिजे, समाज ऋण जर कही प्रमाणात फेडायचे असेल तर सर्वप्रथम फक्त स्वतः च्याच समस्येवर लक्ष केंद्रित न करता, आपल्या आजूबाजूला आपण ज्या समाजात वावरतो ज्या शहरात रोज पोट भरतो, टॅक्स नावाची खंडणी भरतो..

त्याच्या छोट्या मोठ्या समस्या थोड्या तरी जाणून घ्या, कोणाच्याही लाभार्थी दबावाखाली न राहता शांत बसून क्षणभर आपल्या मनोदेवेतला विचार करा कि मला पाच वर्षांतून मिळणाऱ्या या मतदानाच्या संधी मधून मी करतोय आणि करणार ते योग्य आहे की अयोग्य ?

तो माझा पायापाशी विचार आहे की दूरदृष्टीचा?

नुसती झकपक नुसता डामडौल नुसता आश्वासनांचा पाऊस.. मी हे करील मी ते करील.. मुळात अशा हौशा गवश्या, नवश्या उमेदवारांना हा प्रश्न विचारायला शिका की, बाबारे. तू किती शिकला आहेस? तुला आमदार झाल्यावर नेमकं काय करायचं असतं ? त्याचा तरी अभ्यास आहे का? आणि आजपर्यंत तू कुठे होता आणि आणि शहरासाठी काय केले?

मागच्या पाच वर्षात आम्ही सगळे घुळीत, खड्ड्यात, चिखलात अतिक्रमणात हरवलेलो होतो तेव्हा तू कुठे होता? आज अचानक घरोघर हात जोडत का फिरतोस?

निवडणुकीचे डफ वाजायला लागल्यावर तर कोणी येselा बागडा सुद्धा नाचायला लागतो.. पण पाच वर्ष असं नेमके काय केले? त्याने जर सभर्पक उत्तर दिली तर कशाचाही विचार न करता त्यालाच मतदान करा.. आपला उम्मीदे वारीस... म्हणून त्याला जरूर निवडा.. त्यासाठी निष्क्रियता सोडली पाहिजे तरच आपण जिवंत आहोत... हे आपण सिद्ध कस शकू.. नाहीतर असे खूप लोक आहेत जगात किती मेल्यावर समजतं की ते इतके दिवस जिवंत होते...

बात अगर उसुलों पे आ जाये तो, टकराना जरुरी है ... तुम अगर जिंदा हो, तो फिर जिंदा नजर आना जरुरी है..

मतदार बंधू आणि भगिनींनो... मुर्दाड उदासीनता सोडा आणि संकल्प करा की, एकही जण बिगर मतदानाचा राहणार नाही. चला हा देखील एक इतिहास घडवू या ऐतिहासिक शहरासाठी! आणि ही गोष्ट अशक्य अजिबात नाही.. आपण सर्वांनी ठरवलं तर काहीही होऊ शकतं.

– सुहास मुळे, अध्यक्ष, जागरुक नागरिक मंच मोबाईल ९००२६ ६८५५५

अँपे रिक्षामधून अवैध दारू वाहतूक करणाऱ्यांना पकडले

दोघांकडून ३ लाख ४३ हजार १२० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

नगर – विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पे रिक्षामधुन अवैध दारू वाहतुक करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले असून त्यांच्या कडून ३ लाख ४३ हजार १२० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशाल रमेश पाटील (वय २३) व गौतम वाल्मिक जगताप (वय २०, दोघे रा.निघोज निमगाव, ता.राहाता) असे पकडलेल्या दोघांची नावे आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिनेश आहेर यांच्या आदेशानुसार पोलीस अंमलदार गणेश भिंगारदे, रणजीत जाधव, विशाल तनपुरे व रमीजराजा आत्तार यांचे पथक कोपरगाव शहरामध्ये विनापरवाना बेकायदा दारु विक्री करणारे इसमांची माहिती घेत असताना त्यांना माहिती मिळाली की, दोन इसम विना क्रमांकाची क्टीवा मोपेड व पे रिक्षातून अवैध दारू वाहतुक आहेत. तपास पथकाने मिळालेल्या माहितीवरुन वाहनाचा शोध घेत असताना के जी एस कॉलेज रोड, गोदावरी नदीचे पुलावर कोपरगाव येथे संशयीत वाहने मिळून आल्याने, वाहनास थांबवून त्यांची झडती घेतली असता त्यात देशी विदेशी दारूचे बॉक्स आढळून आले. या पथकाने देशी विदेशी दारू, पे रिक्षा व क्टीव्हा मोपेड असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

दोन्ही आरोपीविरुध्द कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयाचा पुढील तपास कोपरगाव शहर पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

मारहाण झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

पोलिसांना खबर दिल्याच्या संशयावरून झाली होती मारहाण

नगर – एलसीबीच्या पोलिसांना तलवार विक्री करत असल्याची माहिती दिल्याच्या आरोपावरुन युवकाला चाकू, लाकडी दांडके, दगड, पट्टयाने मारहाण केल्याची घटना २ नोव्हेंबर रोजी घडली होती. यात जखमी असलेल्या करण अर्जुन साळुंके (वय २२, रा. जे.जे. गल्ही, कोठला) या युवकाचा जिल्हा रूग्णालयात उपचारादरम्यान बुधवारी (दि.१३) मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पाच जणांविरुध्द तोफखाना पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल होता. या गुन्हात खुनाचे कलम वाढविण्यात आले आहे.

सचिन सर्जेराव चव्हाण, संतोष भैरवनाथ पवार (दोघे रा. मंगलगेट, अहिल्यानगर), सचिन लल्लू पवार (रा. कडा ता. आष्टी जि. बीड), प्रवीण सुभाष पवार (रा. भिस्तबाग चौक, सावेडी) व रंजित एकनाथ साळुंके (रा. गजराजनगर, अहिल्यानगर–छत्रपती संभाजीनगर रस्ता) यांच्यावर ४ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल झाला होता. २ नोव्हेंबर रोजी रात्री करण हा कोठला परिसरातील कॉब्ज्या मामा चौक येथे असताना त्याचा नातेवाईक सचिन सर्जेराव चव्हाण, संतोष भैरवनाथ पवार व सचिन लल्लू पवार हे दुचाकीवरून तेथे आले. अनिल सर्जेराव चव्हाण यांच्याकडे पैसे आणण्यासाठी गजराजनगर येथे जायचे आहे, असे म्हणत त्यांनी करण याला दुचाकीवर बसवून गजराजनगर परिसरातील बांबुच्या दुकाना जवळ नेले.

तेथे गेल्यानंतर प्रवीण पवार, रंजित साळुंके हे तेथे आले. त्यांनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. 'तू एलसीबीच्या पोलिसांना मी तलवार विक्री करतो म्हणून माझी माहिती का दिली' असे म्हणत हत्यारने वार केला. लाकडी दांडके, दगड, कंबर पट्टयाने मारहाण करून जखमी केले. त्याच्यावर उपचार सुरू असताना बुधवारी त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी गुन्हात खुनाचे कलम वाढवले आहे. पोलीस पसार संशयित आरोपींचा शोध घेत आहेत.

शहरातील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे काम खूप उत्कृष्ट

माजी आमदार अरुण जगताप यांचे प्रतिपादन; शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा

नगर – राज्यात महायुतीचे सरकार आल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी नगर शहराच्या विकासासठी आ.संग्राम जगताप यांनी सुचवलेल्या सर्व विकासकामांना मंजुरी देत खूप मोठा निधी दिला आहे. संग्राम जगताप यांनी नगर शहराचा ध्यास घेत शहराला मेट्रो सिटीचा दर्जा मिळवून देण्याचा निश्चय केला आहे. या निवडणुकीत महायुतीमधील सर्व घटक पक्षाचे खूप सहकार्य होत आहे. नगर शहरातील गोरगरीब कुटुंबीयांना वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी शहरातील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे खूप उत्कृष्ट काम चालू आहे. या मदत कार्यातून गोरगरिबांचे आशीर्वाद मिळत आहेत. हे काम असेच अखंडितपणे चालू ठेवा, असे प्रतिपादन माजी आमदार अरुण जगताप यांनी केले.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ आयोजित मेळाव्यात माजी आमदार अरुण जगताप यांचा सत्कार करताना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ आयोजित मेळाव्यात माजी आमदार अरुण जगताप यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी अरुण जगताप यांचा सत्कार करून स्वागत केले.

यावेळी जिल्हाप्रमुख बाबू टायरवाले, वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख रणजितसिंह परदेशी, जिल्हा समन्वयक संदीप सप्रे, जिल्हाप्रमुख मंगेश शिंदे, उपजिल्हाप्रमुख काका शेळके, ओंकार शिंदे, अंबादास कराळे, शहर प्रमुख रोहित लोखंडे, विपुल शेटीया, डॉ.विजय भंडारी व शहरातील सर्व उपशहर प्रमुख, समन्वयक, पदाधिकारी उपस्थित होते.

अनिल शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने नगर शहराहत शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे काम चांगल्या प्रकारे चालू आहे. सर्व पदाधिकारी नागरिकांच्या मदतीसाठी कायम तत्पर असतात. याबद्दल वैद्यकीय पक्षाचे कौतुक. विधानसभा निवडणुकीसाठी आता थोडे दिवस बाकी आहेत. त्यामुळे महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांना जास्तीत जास्त मतांनी निवडून आणण्यासाठी सर्वांनी प्रचार करून आ. जगतापांना जास्तीत जास्त मतदान घडवून आणा.

प्रास्ताविकात रणजीतसिंह परदेशी यांनी वैद्यकीय कक्षाची माहिती देताना पक्षाचे काम कशाप्रकारे चालते व नगर शहर व सर्व तालुक्यातील सर्वसामान्य रुग्णांचे हॉस्पिटलची बिलं कक्षाच्या माध्यमातून कमी करून रुग्णांना धीर देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

बाळासाहेब लोटके यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – रा.ठाकूर गल्ही, बागडपट्टी येथील रहिवाशी बाळासाहेब उर्फ शरदचंद्र नारायण लोटके (वय ६५) यांचे १४ नोव्हेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते लोटके पतंगवाले व समर्थ आर्टस्चे संचालक होते.

सेन्सेक्स १०० हून अधिक अंकांनी वाढला, निफ्टीत २० अंकांची वाढ

मुंबई – भारतीय शेअर बाजारात गुरुवारी (दि.१४) काहीशी तेजी दिसून आली. सेन्सेक्स १०० अंकांच्या वाढीसह ७७,८०० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. निफ्टीदेखील २० अंकांनी वाढून २३,५८० च्या पातळीवर व्यवहार करत आहे.

सेन्सेक्समधील ३० समभागांपैकी १५ वाढत आहेत आणि १५ घसरत आहेत. निफ्टीच्या ५० समभागांपैकी २३ वाढत आहेत आणि २७ घसरत आहेत. एनएसईच्या क्षेत्रीय निर्देशांकात, एफएमसीजी आणि हेल्थकेअर वगळता, सर्व क्षेत्र वाढीसह व्यवहार करत आहेत.

याआधी बुधवारी (दि.१३) रोजी सेन्सेक्स ९८४ अंकांनी घसरला होता आणि ७७,६९० च्या पातळीवर बंद झाला होता. निफ्टीमध्येही ३२४ अंकांची घसरण होऊन तो २३,५५९ च्या पातळीवर बंद झाला. त्याच वेळी बीएसई स्मॉलकॅप ९,६५१ अंकांनी घसरला आणि ५१,९५२ वर बंद झाला. सेन्सेक्समधील ३० समभागांपैकी २६ समभाग घसरले आणि ४ वर होते. निफ्टीच्या ५० समभागांपैकी ४४ समभाग घसरले आणि ६ वर होते. एनएसईच्या सर्व क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये घसरण झाली.

सौ. सुनंदा कोंढारे यांचे हृदयविकाराने निधन

नगर – भंडारी कॉलनी, बोल्हेगाव, नागापूर येथील रहिवाशी सौ. सुनंदा पांडुरंग कोंढारे (वय ५९) यांचे १४ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती, २ मुली, १ मुलगा, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

श्रीकांत माथेसूळ यांचे अल्प आजाराने निधन

नगर – गुलमोहोर रोड, सावेडीतील मंगल हौसिंग सोसायटीत राहणारे श्रीकांत पुरुषोत्तम माथेसूळ (वय ७१) यांचे १२ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ भाऊ, भाऊजया, ३ बहिणी, मेहुणे, २ मुली, १ मुलगा, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आनंद माथेसूळ यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंडेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंडेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

विहार दरम्यान साधू साध्वींना पोलिस सुरक्षेचे आदेश जारी

नगर – जैन समाजाचा चातुर्मास पर्व १५ नोव्हेंबर रोजी संपत असून, तात्काळ सकल जैन समाजातील साधू साध्वी भगवंतांचा विहार पदभ्रमण चालू होत आहे. सकल जैन समाजातील साधू साध्वी भगवंत मोठ्या प्रमाणात अहिल्यानगर जिल्हातून पदभ्रमण करत असतात. त्यांचा विहार सुखरूप, सुरक्षित व्हावा या अनुषंगाने विहारादरम्यान पोलीस संरक्षण तसेच त्या ठिकाणी आवश्यक असेल त्या ठिकाणी जिल्ह्यात शासकीय शाळा, महाविद्यालय, कार्यालय व इतर सार्वजनिक ठिकाणी तात्पुरत्या काही कालावधीकरिता विहार दरम्यान मुक्कामाची सुविधा, प्रवचन करिता सार्वजनिक ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी या संबंधात जिल्हा प्रशासनाला सूचना करावयात, अशी मागणी मिशन सेफ विहार राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष हंसिन शहा यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती.



यश शहा

जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनाने इंजि. यश शहा यांच्या या ई मेलची तात्काळ दखल घेत यासंदर्भातील आदेश जारी केले असून, तात्काळ कार्यवाही करण्यासंदर्भात जिल्हा पोलीस प्रशासन, जिल्हा परिषद व महानगरपालिका यांना कळवले आहे. शहा यांनी मुख्यमंत्री कार्यालय, उपमुख्यमंत्री कार्यालय, अल्पसंख्यांक विभाग यांना संपूर्ण महाराष्ट्रात विहार दरम्यान पोलीस सुरक्षा देण्याबाबतचे पत्र ई–मेल द्वारे पाठवले आहे. या ई मेलची दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने संदर्भात संबंधित गृह विभाग शाखेला कळवले आहे, असे शहा यांनी सांगितले.

शहरात विकासकामांची घोडदौड कायम राखण्यासाठी नगरकरांची साथ मिळेल

आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; प्रभाग क्रमांक १० मध्ये प्रचारफेरीस नागरिकांचा प्रतिसाद

नगर – नगर शहराचा लोकप्रतिनिधी म्हणून केलेली विकासकामे समोर ठेवून पुन्हा एकदा नगरकरांचा कौल मागत आहे. नगरकरांनाही विकासकामे प्रत्यक्षात दिसत आहेत. त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर होत आहेत. निवडणुकीत मताचा जोगवा मागताना आपण केलेला विकास जनतेसमोर ठेवून मतदानाचे आवाहन करीत आहे. बाजारपेठ असो कि झोपडपट्टी मात्र, प्रत्येक ठिकाणी विकासाची घोडदौड पहायला मिळत असून हा पूर्णविराम नसून स्वल्पविराम आहे. येणाऱ्या काळात यापेक्षाही भरीव विकास करण्यासाठी नगरकर साथ देतील असा विश्वास नगर शहर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील मंगलगेट, रामवाडी, कोटला परिसरात आ.संग्राम जगताप यांनी प्रचार रॅली काढून स्थानिक मतदारांशी संवाद साधला. त्यांचे ठिकठिकाणी महिलांनी औक्षण करुन स्वागत केले. व्यावसायिक, दुकानदारांनी आवर्जून या परिसरात झालेल्या विकासकामांबद्दल आनंद व्यक्त करीत आ.जगताप यांचे मनापासून आभार मानले.

आ.जगताप पुढे म्हणाले, सर्जेपुरा हत्ती चौकात पूर्वी पाणी साचून नागरिकांची गैरसोय व्हायची. वास्तविक हा रस्ता मुख्य बाजारपेठेला थेट सावेडी उपनगराशी जोडणारा सरळ रस्ता आहे. त्यामुळे या संपूर्ण रस्त्याचा कायापालट करण्याचे ठरवून नियोजन केले. सुरुवातीला हत्ती चौकातील पाणी साचणं थांबविण्यासाठी चहूबाजूंनी कॉंक्रिटिकरण केले. कोटला परिसरातही अंतर्गत कॉंक्रिटिकरण करण्यात आले. आता पत्रकार चौक ते अप्पू हत्ती चौक ते हत्ती चौक व तेथून पुढे थेट तेलीखुंट चौकापर्यंत कॉंक्रिटिकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या बरोबरीला रामवाडीतही अंतर्गत रस्ते कॉंक्रिटचे केले आहेत. त्यामुळे येथील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागला आहे. लोकप्रतिनिधी म्हणून विकासकामे करणे हे कर्तव्य असून त्या कामांमुळेच पुन्हा एकदा मतदान होईल असा विश्वास आहे.

गृहिणी

आरोग्य

असा असावा आहार

दैनंदिन जीवनात कच्च्या भाज्या खाण्यावर भर द्यायला हवा. आहारात नेहमी कच्ची फळे आणि भाज्या असायला हव्यात. तसेच हिरव्या भाज्यांचे प्रमाण अधिक असायला हवे. त्यासोबतच उकडलेल्या डाळींचाही समावेश करायला हवा.

पाककला

वरीचा पुलाव

साहित्य : एक कप वरीचा तांदूळ, दोन टेबलस्पून तूप, दोन लवंगा, जिरे, दोन-तीन मिरच्यांचे तुकडे, अर्धा इंच आले, साखर व मीठ चवीनुसार, अर्धा कप दाण्याचा कूट, दहा-बारा बेदाणे, अर्धा कप रताळ्याच्या फोडी, कोथिंबीर, दहा-बारा काजूचे तुकडे.

कृती : वऱ्याचे तांदूळ धुवून ठेवावेत. एका मोठ्या भांड्यात तूप गरम करून त्यात जिरे, लवंग, मिरचीचे तुकडे घालावेत. वरी तांदूळ घालून अंदाजे पाणी घालावे. त्यात बटाट्याच्या फोडी आणि रताळ्याच्या फोडी घालाव्यात. दाण्याचा कूट, मीठ आणि साखर घालून शिजवून घ्यावे. दुसऱ्या पॅनमध्ये थोडे तूप घालून काजू आणि बेदाणे परतून घ्यावेत. हे त्या वरीवर घालून छान मिसळून घ्यावे. कोथिंबीर घालून छान वाफ द्यावी.

टीप- सुरणाच्या फोडी, रताळ्याच्या फोडी वेगळ्या शिजवून तुपात थोडेसा परतून शेवटी वऱ्याच्या तांदळात मिसळल्या तरी चालतात.

सौंदर्य

चमकदार केसांसाठी

डोक्यावरील सर्व केस पुढे पाडून विंचरा, डोके डावीकडे झुकवून केस डावीकडे पाडून व उजवीकडे डोके करून केस उजवीकडे पाडून विंचरावेत. यामुळे केसांची मुळे बळकट होऊन केस चमकदार व निकोप होतात.

वास्तू

कामाच्या वेळेत डेस्क किंवा टेबलवर डोके टेकवून झोपू नये. त्यामुळे शरीरातील ऊर्जेची पातळी कमी होते.

सल्ला

* बदाम, बडीशेप आणि खडीसाखर एकत्र वाटून दररोज जेवणानंतर १ चमचा सेवन केल्यास स्मरणशक्ती वाढते.

* आवळ्याचा चमचाभर रस जिरे व खडीसाखर यांचे मिश्रण सकाळ, संध्याकाळ दोन-तीन दिवस घेतल्यास आम्लपित्त कमी होते. पित्तामुळे भोवळे येणे कमी होते. लघवीच्या विकारांवर हे परिणामकारक औषध आहे.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४

त्रिपुरारि पौर्णिमा, गुरुनानक जयंती, तुलसी विवाह समाप्ति, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, भरणी २१।५५ सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०६ वा. २४ मि.

राशिभविष्य

मेष : आजचा दिवस आपल्या करियरवर विधायक परिणाम घडवू शकतो.

वृषभ : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. वाहनसुख मिळेल. उत्तम भोजनाचे सुख मिळेल.

मिथुन : आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपला जोडीदार आपल्याबरोबर राहील

कर्क : आजचा दिवस छान जाईल. मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल.

सिंह : एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता.

कन्या : आरोग्य नरम-गरम राहील. नोकरदार मंडळीना हिंतशत्रूंपासून त्रास होईल. मुले त्रास देऊ शकतात.

तूळ : मित्रांपासून आनंद मिळेल. एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित रहाल.

वृश्चिक : आजची संध्याकाळ आपणासाठी फारच अर्थपूर्ण होईल.

धनु : छोटया-छोटया अडचणी येतील. पण त्याकडे दुर्लक्ष कराल. काळजीपूर्वक कार्य कराल.

मकर : योजनाबद्धरीतीने आपले काम करण्याचा प्रयत्न केल्याने यश.

कुंभ : पळापळ अधिक राहील. आरोग्य बिघडेल. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळाल.

मीन : संवाद कायम ठेवण्याचा प्रयत्न कराल. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास लाभेल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

हसा आणि शतायुषी व्हा!

'एकदा एका ज्योतिषाकडे एक महिला गेली आणि त्याला भविष्य विचारू लागली.'
'तुम्हाला लवकरच वैधव्य येणार!...'
ज्योतिषी म्हणाला,

'तुमच्या नवऱ्यावर सुरीहल्ला होईल.'
त्या महिलेने एक दीर्घ सुस्कारा सोडला आणि विचारले,
'मी निर्दोष सुटेल ना?'

...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* पुढीलपैकी कोणत्या जिल्ह्यात दारूबंदी नाही? - भंडारा
* मुंबई हाय येथे कोणते खनिज उत्पादन होते? - पेट्रोल
* भारतात सर्वाधिक कॉफीचे उत्पादन कोणत्या राज्यात होते? - कर्नाटक
* केंद्रीय माहिती अधिकार कोणत्या साली लागू झाला? - २००५

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

फिल्मीचक्कर क्र. ११६३

सौ. शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) राजेश खन्ना, तनुजा, सुजितकुमार, हेलन, राजेंद्रनाथ यांचा एक चित्रपट ५) +++ निश्चल (दिवंगत अभिनेता) ७) ++ बहन (चित्रपटाचे नाव) ९) 'शोले' चित्रपटातील अमिताभ बचनचे नाव १०) संजय दत्त, अनिता राज, गोविंदा, नीलम, शक्ती कपूर, परेश रावल, अनुपम खेर, सदाशिव अमरापूरकर यांचा एक चित्रपट १३) राज कपूर, राजेंद्रकुमार, वैजयंतीमाला यांचा एक गाजलेला चित्रपट १५) ++ झिंटा (अभिनेत्री) १६) शत्रुघ्न सिन्हा, हेमामालिनी, झीनत अमान, मिथुन चक्रवर्ती यांचा एक चित्रपट

उभे शब्द :- १) जितेंद्र, हेमामालिनी, शक्ती कपूर; परवीन बाबी, रणजीत, ओम शिवपुरी, विजय अरोरा, कादरखान यात आहेत २) +++ मृत्यू (चित्रपटाचे नाव) ३) बावरे +++ (चित्रपटाचे नाव) ४) मिथुन चक्रवर्ती, पूजा भट्ट यांचा चित्रपट ६) सनी देओल, जयाप्रदा, प्रसन्नजीत, शांतिप्रिया, अरुणा इराणी, प्रेम चोप्रा, शक्ती कपूर यात आहेत ८) ++ ज्ञानेश्वर (चित्रपटाचे नाव) ११) ++++ से कयामततक (चित्रपटाचे नाव) १२) 'शोले'मधील हेमामालिनीचे नाव १४) कबीर ++ (अमिनेता)

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : मनातील सर्व घाण धुऊन जाईल, तेव्हाच ईश्वराचे दर्शन होईल. **- रामकृष्ण परमहंस.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

डोक्यात केस नसलेले गोल चट्टे कशामुळे येतात?

काहीजणांच्या डोक्यात केस नसलेले चट्टे दिसतात. बरेच जण समजतात की, उंदीर चावल्यामुळे असे चट्टे येतात व पुन्हा तेथे केस येत नाहीत. डोक्याचे केस जाण्याची अनेक कारणे आहेत. डोक्याच्या त्वचेला जंतूसंसर्ग झाला असेल, दाह असेल तरी केस गळतात. याखेरीज टिनीया कॅपिटीससारख्या रोगातही केस गळतात. डोक्यात केस नसलेले गोल चट्टे असण्याचे मुख्य कारण म्हणजे, कारण माहीत नसलेला ॲलोपेशिया एरॅटा हा रोग. ३० टक्के रुग्णांमध्ये आनुवंशिक कारणे सापडतात. यात डोक्यात दोन वा तीन केस नसलेले चट्टे असतात; पण डोक्याची त्वचा मात्र निरोगी असते. या चट्टयांवर केस नसले तरी ६ ते १२ महिन्यानंतर परत केस उगवतात. त्यामुळे काळजी करण्याचे कारण नसते. त्वचेच्या जिवाणू वा बुरसी संसर्गामुळे केस जात असतील, तर मात्र त्यावर योग्य ते उपाय करावे लागतात. म्हणजे केस गळायचे थांबतात.

लोभाचे फळ

अकबराने कोणताही अवघड किंवा गुढ प्रश्न विचारावा आणि बिरबलाने आपल्या बुद्धिचातुर्याने उत्तर द्यावे असे नेहमी घडत असे. बिरबलही प्रत्यक्ष उदाहरणातून असे उत्तर देत असे की बादशहा अकबरासह दरबारातील सर्व मानकरी आश्चर्यचकित होत असत. एकदा अकबराने बिरबलाला विचारले की, 'राजउद्यानातील कोणीही पाहिलेली नाही अशी आश्चर्यकारक गोष्ट तू मला दाखवू शकशील का? त्यावर बिरबलाने ताकाळ 'हो' म्हटले. त्यासाठी बिरबलाने राजमहालातून भरपूर मध मागवून घेतलं. त्या शाही उद्यानात वातमृग येत असे. हा अतिशय दुर्मीळ आणि मानवाची चाहूल लागताच क्षणात पळून जाऊन दिसेनासा होणारा प्राणी. बिरबलाने आणलेला सर्व मध त्या उद्यानातील गवतावर पसरवून टाकला.

थोडयावेळाने वातमृग आला. खाता खाता त्याला गवत गोड लागल्याने तो गवत खाण्यात गुंग होऊन गेला. वातमृगाने तेथील सारे गवत खाऊन संपविले, तेव्हा बिरबलाने आपल्या जवळील मधमिश्रित थोडे थोडे गवत त्याच्यासमोर टाकत टाकत त्याला राजवाड्यात गवत खाण्यात गुंगलेला वातमृग राजवाड्यात आला.

बिरबल म्हणाला, महाराज, हे पाहा उद्यानातील वेगळे आश्चर्य, जो वातमृग माणसाची चाहूल लागताच क्षणात दिसेनासा होतो तो आज भर दरबारात आला आहे. राजाने आपल्या प्राणीसंग्रहालयाचे वैभव वाढविण्यासाठी लगेच त्या वातमृगाला आपल्या प्राणी संग्रहालयात दाखल केले. आणि वातमृग कैद झाले.

तात्पर्य : लोभ आवरता आला नाही की घात हा ठरलेलाच असतो.

जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

सबसे ऊपरी उपलोक में ब्रह्मविद्या के माहिर और उनके शिष्यों की आत्माएँ आती हैं क्योंकि केवल दीक्षित व्यक्ति ही 'संकरे द्वार' या सदैव जीवन की ओर ले जाने वाले तंग मार्ग को ढूँढ सकता है। इस तरह कुछ चुने हुए ही ब्रह्म के देश और जीवन लोक में प्रवेश कर पाते हैं। वे निजी चेतनता अभी ब्रह्म चेतनता से भरपूर नहीं होती, का पूरा आनंद प्राप्त करते हैं ।

अंत में श्रीमती ऐनीबैसेंट, श्रीमति का सारांश निकालती हुई ऐसे कहती है:- ऐसा है सात स्वर्गों या लोकों का नक्शा जिनमें से किसी न किसी में मनुष्य समय काल मौत रूपी तबदीली के बाद गुजरता है। मौत क्योंकि इस तबदीली के अलावा कुछ नहीं, जो मनुष्य को उसे बांधे हुए सबसे कठोर बन्धनों से सीमित मुक्ति दिलाने के लिए आती है। यह केवल अधिक विशाल जीवन में जन्म लेना है। थोड़े समय के बनवास के बाद आत्मा के सच्चे घर (ब्रह्माण्डी मन के घर) वापिस आना, एक फंद से निकलकर ऊपरी हवा की आज़ादी में जाना है। जीवन की स्थितियों में केवल तबदीली आती है, मौत नहीं। मौत मृत्यु लोक का एक सबसे बड़ा भ्रम है । जीवन एक निरन्तर होने के कारण यह शारीरिक चोले के समाप्त होने से समाप्त नहीं हो जाता। एक पानी वाले बर्तन जिसमें आकाश नजर आता हो, के टूट जाने से जैसे हम आकाश के टूटने की कल्पना कर लेते हैं

जीवन की रोशनी

इसी तरह हम समझते हैं कि शरीर के मर जाने से आत्मा मर गई है। यद्यपि ऐसा नहीं है। मनुष्यता की मौत के पीछे दौड़ तीनों ही लोकों-स्थूल, सूक्ष्म और कारण में निरन्तर रहती है, कहीं रुकती नहीं। स्थूल चोले से स्वतंत्र होने के पश्चात् आत्मा अपने ही विचारों, शब्दों और कर्मों के वेग द्वारा आवागमन के ब्रह्म चक्र में ऊपर नीचे से नीचे के स्थूल संसार से लेकर मानसिक लोक तक फैली हुई है जहाँ तक मौत के पश्चात् थोड़े या अधिक समय तक, ब्रह्म के ज्ञान आदि सीखने के लिए समय के अनुसार ठहराव के लिए तम्बू लगा लेती है। ज्यों-ज्यों यह पूर्णता के पथ पर आगे बढ़ती जाती है, हर आत्मा, त्रिलोक में स्थित भिन्न-भिन्न उप लोकों, जिनका पीछे वर्णन किया गया है, में अपने चारों ओर की बाहरी शक्तियों के उभार से, वेग में आई हुई आत्मा के सारे कारण जब तक पूरी तरह समाप्त नहीं हो जाते, यह कर्मों की फसल एकत्र करती रहती है ।

आत्मा के सबसे निम्न कारण शरीर में दो और सूक्ष्म और उन्नत लोक हैं जिन्हें क्रमानुसार बौद्धिक या विज्ञानमयी कोष और निर्वाणिक या आनन्दमयी कोष कहा जाता है। राजकुमार सिद्धार्थ जैसी कोई बहादुर बहुत बहादुर आत्मा ही बुद्धत्व को प्राप्त करके बुद्ध बन सकती है और त्रिलोकी के मालिक का आनन्द प्राप्त कर सकती है और फिर धरती पर आकर संसार के सामने धर्म के सिद्धान्त प्रस्तुत करके मन को बन्धन से स्वतंत्र करने के लिए, पूर्णता को प्राप्त करने के लिए इच्छा रहित होकर अष्ट मार्ग पर चलने के लिए बल दे सकती है या फिर जैन तीर्थंकर महावीर जैसा बहादुरों का बहादुर ही ब्रह्म के सिंहासन तक पहुँचने का साहस कर सकता है और फिर संसार को सारी सृष्टि से प्रेम तथा अहिंसा का, धरती पर रेंग रहे छोटे कीड़े, पानी और हवा में तैर रही अनेक अदृश्य आत्माओं के साथ प्यार करने का संदेश दे सकता है। बुद्ध लोक में मनुष्य ईश्वरीय शक्ति की बुद्धि के पक्ष का विकास करता है और अपने अन्तर स्थित 'निज' को आस-पास के सारे जीवों में देखना आरंभ कर देता है और देखता है कि दूसरों के अन्तर स्थित निज ही उसमें भी है। इस तरह उस अस्तित्व की प्रारंभिक महान एकता, 'सूत्र आत्मा' तक पहुँचता है और जलवायु की अवस्थायें, अन्दर और बाहर के शकल, आकार और रंग, मानसिक रचना, अन्तरी विकास और बुद्धि के कारण आये हुए फर्क के होते हुए भी एक छोटी चींटी से लेकर हाथी तक को माला के मनकों की तरह एक माला में पिरोये हुए देखता है। अब ब्रह्म का बाहर निकाली हुई जीवन रूप आत्मा ब्रह्म की शक्तियों तथा गुणों से युक्त होकर, अन्तर्मुख खींची हुई सृष्टि के दिल - सत् चित आनंद के दैवी आनंद या निर्वाणक चेतना के आनन्द भोगने की इच्छा करने लगती है तथा इसका आनन्द लेने लगती है।

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

अंतरिक बल (भाग - २)

भूल कर भी भूतकाल की बातो के बारे सोचना नहीं। जितना समय आप भूतकाल में गंवाएंगे, उतने समय में संसार को बहुत कुछ कर के दिखा सकते हैं। समय का ऐसा प्रबन्धन करें जिस से आप का एक मिनिट भी व्यर्थ न जाए। जब एक कार्य समाप्त हो जाए तो दूसरे कार्य में लग जाओ। परंतु ऐसा बहुत कम व्यक्ति करते है। प्रायः एक काम खत्म कर के व्यक्ति आराम करने लगता है। ये विश्राम नहीं, आलस्य है, काम से जी चुराना है। जीवन का समय विशिष्ट प्रकार की रचना, सुधार और सीखने का समय है। केवल ५ मिनिट का महत्व न समझने वाले देश हार गये। जो शक्ति हम आज के काम को कल पर टालने में बर्बाद करते हैं, उसी शक्ति द्वारा आज का काम आज ही समाप्त किया जा सकता है। जो व्यक्ति सुबह जल्दी उठते हैं। वह बहुत कार्य संपन्न कर देते हैं। वह काम नहीं टालते। संसार के महान व्यक्ति चार बजे ही उठा करते थे। एक मैनेजर दिन निकलने से पहले ही ३० पत्रो के जवाब लिख देते थे। समय पर ठीक ढंग से काम करने की आदत डालो।

समय प्रबन्धन और अवसर

अवसरवादी न अपनी योग्यता तराशता है न संघर्ष करता है। वह तो भेडिये की तरह होता है जो सोए हुए शिकार को तलाशता है। कमजोरों पर दावं

अंतरीक बल

खेलता है। अवसरवादी स्वयं के लाभ के इलावा समाज को कुछ नहीं दे पाते। वह सब कुछ लेने के लिये ही करता है। इंटरव्यू में पूछे गये छोटे छोटे प्रश्न हमारे भीतर के व्यक्तित्व को स्केन कर लेते हैं। इन्टरव्यू यह समय है जब आप को अपनी क्षमता दिखानी होती है। वकील एक तर्क चूकते ही हार जाता है। गणित का पेपर हो और हिन्दी की तैयारी कर के जाना ये अवसर नहीं है। अच्छे अवसर सब को मिलते हैं परंतु हम उन्हें पहचान नहीं पाते। कभी कभी तो यह हमें अवसर ही नहीं लगते। अच्छा और अच्छा करते करते अच्छा अवसर भी हाथ से निकल जाता है। सेनापति चीख चीख कर आदेश दे रहा था सैनिक भारी यंत्र को उठा नहीं पा रहे थे। कहीं से कोई व्यक्ति आया उसने वह यंत्र उठवा दिया। सेनापति ने कहा कौन हो तुम, तुम्हारा पता बताओ ताकि फिर कभी तुम्हे बुलाया जा सके। उसने नाम बताया कि उसे जार्ज वाशिंगटन कहते हैं और राष्टपति भवन में रहता हूं। सेनापति सन रहा गया। राष्ट्रपति एक पल में प्रबन्धन सिखा गया। सिर्फ आदेश से कुछ नहीं होता। काम लेने

के लिये जरूरी है स्वयं भी काम में प्रवृत हो जाना। यही समय प्रबन्धन है।

अवसर और समय प्रबन्धन

ऋषि सौ साल तपस्या करते थे परंतु ज्ञान एक क्षण में प्रकट होता था। आर्कमिडीज का यूरेका यूरेका वही एक क्षण था। न्यूटन का गुरुत्वाकर्षण की खोज वही क्षण था। आईनस्टीन का सापेक्षतावाद की खोज वही क्षण था। इन महान महापुरुषों द्वारा यदि उस क्षण को गवां दिया होता तो तमाम जीवन का समय लगाना भी उनके लिये बेकार था। हाकी और फुटबाल के मैचो में जब गोल करने की बरी आती है तो यह वही अवसर है। अवसर कहीं भी, कभी भी आ सकते हैं, मिल सकते हैं, हारते हारते भी मिल सकते हैं। हम अक्सर सोचते हैं पता नहीं सही समय कब आएगा। सच तो यह है कि अवसर हमारे समने आ कर, ठहर कर चला जाता है और हम पहचान नहीं पाते। अवसर कभी दुबारा नहीं खटखटाते। दुनिया में ऐसा कोई मनुष्य नहीं जिस के पास एक बार भाग्योदय का अवसर न आया हो। क्या आप कुछ भी कर गुजरने में अपने को लाचार अनुभव करते हैं। इसका कारण हो सकता है शायद किसी ने आप को लाचार कर दिया है। एडिसन को उसकी टीचर ने नहीं पहचाना और उसे स्कूल से निकाल दिया।

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

गर्भास्थेतील पहिले तीन महिने-आहार

गर्भवतीने पाण्याभध्ये ज्येष्ठमध पावडर टाकून ते पाणी सतत प्यावे. तसेच या काळात जास्त मळमळ होत असल्यास वेलची, लवंग किंवा आवळा कंण्डी, आवळा सुपारी तोंडात धरावी. गर्भवतीने अतिरिक्षत पदार्थ टाळावेत. गाडीवरचे पदार्थ, भेळ, वडापाव, पाणीपुरी, शेवपुरी, पिझ्झा, बर्गर, पावभाजी या पदार्थांचा मोह टाळावा. बाहेरचे पाणी पिऊ नये. दूषित पाण्यामुळे व अन्नामुळे पोटाचे आजार होण्याचा संभव असतो. उदा. गॅस्ट्रोसारखे आजार होतात. तसेच किटकनाशक जास्त वापरलेला भाजीपाला, अन्न किंवा शीतपेयामुळे फॉलीक ॲसिडची कमतरता निर्माण होऊन मेंदुचा विकास व्यवस्थित होत नाही. म्हणून भाज्या दोन ते तीन वेळा पाण्यानं स्वच्छ धुवून खाव्यात. आपल्या देशात याच वर्षी शास्त्रज्ञांनी केलेल्या परिक्षणानुसार असे लक्षात आले की, नवीन पीक किंवा किटकनाशकयुक्त भाजीपाला बाजारात येत असल्यामुळे या काळात गर्भस्थ बाळाच्या मेंदूची वाढ चांगली होताना दिसून येत नाही. तसेच अशी मुले मतीमंद किंवा इतर शारीरिक व्यंगांनी युक्त होतात. असे होऊ नये म्हणून गर्भवतीने नवीन धान्या ऐवजी जुने धान्य वापरावे व बाहेरच्या अन्नाऐवजी घरचे सात्त्विक जेवण घेऊन योग्य आहार विहारावकडे लक्ष द्यावे. उदा. भाज्यांचे गरम सूप, फळांचे ज्यूस, नारळाचे पाणी प्यावे. ॲक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेऊ नयेत.

मातृजं हास्य हृदयं मातृश्च हृदयेन तत् ।
सम्बध्दं तेन गर्भिण्या नेष्टं श्रद्धाविधारणम् ।।

म्हणजे गर्भाचे हृदय हे मातेच्या अंशापासून होते व त्याचा मातेच्या हृदयाशी संबंध असतो; म्हणून गर्भवतीचे डोहाळे पुरवायला हवेत. आजच्या विज्ञानयुगात चौरस आहार म्हणजेच डोहाळे पुरवणे होय. गर्भ पोषणासाठी पूर्णपणे मातेवर अवलंबून असतो; म्हणूनच माता जो काही आहार घेईल तो बाळाला मिळतो. जन्माला आल्यानंतर बाळाला कोणीही भरविले तरी चालते; परंतु गर्भस्थ बाळाची वाढ आईविषयीच कोणीही करू शकत नाही. म्हणूनच डोहाळे म्हणजे बाळाला झालेली खाण्याची इच्छा; जी तो आईच्या माध्यमातून भागवितो हेच वाग्भटांनी सांगितले आहे. संत एकनाथांनी भावार्थ रामायण या ग्रंथातील नवव्या अध्यायात गर्भ दुःखाचे वर्णन करताना म्हटले आहे की, माता जेव्हा कडू, आंबट, खारट पदार्थ खाते तेव्हा गर्भाचे सर्वांग

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मल-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

राष्ट्रीय ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा – २०२४

सुर्या थात्तु, पूजा दानोले महाराष्ट्र संघाचे कर्णधार

नगर – चेन्नई, तामिळनाडू येथे १५ ते १९ नोव्हेंबर दरम्यान ७६ वी सिनीअर, ५८ज्युनिअर आणि ३९वी सब ज्युनीअर राष्ट्रीय ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी पुरुषांमध्ये आंतरराष्ट्रीय सायकलपटू सुर्या थात्तु आणि महिलांमध्ये आंतरराष्ट्रीय पदक विजेती सायकलपटू पूजा दानोले यांची निवड करण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय पंच आणि प्रशिक्षक सुदाम रोकडे यांच्या अध्यक्षतेखालील प्रताप जाधव, प्रा. संजय साठे, श्रीमती दिपाली पाटील, मिलींद झोडगे आणि उत्तम नाळे यांच्या समितीने महाराष्ट्राचा २१ पुरुष आणि २० महिला असा एकूण ४१ सायकलपटूंचा संघ जाहीर केला. मुख्य प्रशिक्षक म्हणून महाराष्ट्र शासनाच्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीमती दिपाली पाटील यांची नेमणूक करण्यात आली आहे.

महाराष्ट्राच्या संघ पुढीलप्रमाणे : पुरुष : मेन ईलीट: सूर्या थात्तू (कर्णधार), मंगेश ताकमोगे, वेदांत जाधव (तिघे पुणे), मंथन लाटे (ठाणे), वेदांत ताजने (नाशिक), विवान साळू (मुंबई) मेन ज्युनिअर : साहिल शेटे, हरिष दिपक डोंबाळे समरजीत हरी थोरबोले (दोघे क्रीडा प्रबोधिनी पुणे), सोहम पवार (दोघे पुणे), सखांत मोठे (सांगली) बॉईज सब ज्युनिअर : सिद्धेश सर्जेराव घोरपडे ,ओंकार जोतिराम गांधले, प्रणय भागाण्णा चिनगुंडे, श्रीनिवासअनंता जाधव, अशिष संजय पवार, (सर्व क्रीडा प्रबोधिनी पुणे), शंभूराजे यादव (धाराशिव)

युथ बॉईज : संस्कार घोरपडे, अर्णव गौड, अनुज गौड, अर्णव गुडाळकर (सर्व पुणे) महिला गट वुमेन ईलीट : पूजा दानोले (कर्णधार – कोल्हापूर), श्वेता गुंजाळ, अदिती प्रमोद डोंगरे (क्रीडा प्रबोधिनी पुणे) संस्कृती खेसे (दोघी पुणे), शिया ललवाणी (नाशिक) वुमेन ज्युनिअर : सायली आरके (कोल्हापूर), आश्रिता म्हेत्रे (जळगाव), आसावरी अनिल राजमाने, ऋतिका भाऊसो शेजुळ (दोघी क्रीडा प्रबोधिनी पुणे), गर्ल्स सब ज्युनिअर : आभा सोमण (पुणे), प्राजक्ता सूर्यवंशी (सांगली), प्रेरणा शिवाजी कळके, श्रावणी अमोल कासार (दोघी क्रीडा प्रबोधिनी पुणे), निकिता शिंदे (कोल्हापूर) युथ गर्ल्स : गायत्री तांबवेकर, ज्ञानेश्वरी माने, मुग्धा कर्वे, सृष्टी जगताप (सर्व पुणे)

मुख्य प्रशिक्षक : श्रीमती दिपाली पाटील महिला प्रशिक्षक / व्यवस्थापक : श्रीमती दिपाली शिलवणकर प्रशिक्ष : दर्शन बारगुजे प्रशिक्षक / मेकॅनिक : स्वप्निल माने व्यवस्थापक : रविंद्र पानकडे.

जात वैधता प्रमाणपत्रांच्या त्रुटी पुर्ततेसाठी विशेष मोहीम

नगर – जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्यावतीने मागासवर्गीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी १४ ते २८ नोव्हेंबर या कालावधीसाठी विशेष त्रुटी पुर्तता मोहीम राबविण्यात येणार असून या मोहीमेला विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य यांनी केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ वर्षामधील एसईबीसी, इमाव व इतर राखीव प्रवर्गामधून प्रवेशासाठी इच्छुक आणि जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अहिल्यानगर येथील कार्यालयात प्रस्ताव दाखल करुन पावतीच्या आधारे प्रवेश निश्चित केल्यानंतर अद्यापपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या सर्व उमेदवारांसाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे.

जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, अहिल्यानगर कार्यालयातील चौकशी कक्षाचे जवळ विशेष त्रुटी पूर्तता मोहिम कक्ष तयार करण्यात आलेला आहे. अर्जदार विद्यार्थ्यांनी ई–मेल वर समितीकडून कळविण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी आपल्या जात प्रमाणपत्र पडताळणी अर्जाची पावती तसेच जाती दावा सिद्ध करणाऱ्या महसुली तसेच शालेय सर्व मूळ कागदपत्रांसह समिती कार्यालयात उपस्थित रहावे आणि आपल्या प्रकरणांतील त्रुटींची पुर्तता करावी. त्रुटी पूर्तता केलेल्या प्रकरणांवर समितीकडून तात्काळ कार्यवाही करुन निर्णय घेण्यात येणार आहे. त्रुटी पूर्ततेअभावी प्रकरणे अर्जदार स्तरावर प्रलंबित राहिल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबदार असेल. या विशेष मोहिमेमध्ये अर्जदार यांनी आपआपले जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणांची त्रुटी पुर्तता करुन करावी, जेणेकरुन संबंधित अर्जदार यांना वैधता प्रमाणपत्र निर्गमित करणे समितीस सुलभ होईल, असेही समितीकडून कळविण्यात आले आहे.

हिंदू परिट समाजाच्यावतीने संग्राम जगताप यांना पाठिंबा

श्री संत गाडगे महाराज मराठा परिट धोबी समाज ट्रस्ट, अहमदनगर यांच्यावतीने आ. संग्राम जगताप यांना पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी समस्त परिट समाज अहमदनगर यांच्यातर्फे बिनशर्त पाठींबा असून पाठींबा देण्यामध्ये समाजाचे कुठलेही हित न बाळगता पाठिंबा देण्यात येत असल्याचे ट्रस्टचे मनोज शिरसाठे, नंदकिशोर रोकडे यानी म्हटले आहे.

अहमदनगर डिस्ट्रीक्ट फर्टिलायझर्स सीडस ॲण्ड पेस्टीसाईड डिलर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी छबुराव हराळ यांची निवड

नगर – अहमदनगर डिस्ट्रीक्ट फर्टिलायझर्स सीडस ॲण्ड पेस्टीसाईड डिलर्स असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच्या नगर शहरातील नक्षत्र लॉन येथे पार पडली. जिल्हा असोसिएशनचे २५०० सभासद असुन असोसिएशन जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांचे अडचणी सोडवण्याचे काम करते संघटनेच्या सन २०२४ ते २०२९ या पाच वर्षासाठी छबुराव हराळ यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

सभेच्या सुरवातीला थोर नेते, महात्मे व संस्थेशी निगडीत अशा दिवगंत विभूतींना श्रध्दांजली अर्पण करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

अध्यक्षपदी निवड झालेले छबुराव हराळ हे सन २००० ते २००५ अहमदनगर जिल्हा खते, बियाणे, किटकनाशके या संघटनेचे ५ वर्ष उपाध्यक्ष होते, तसेच गुंडेगाव विविध कार्यकारी सेवा संस्थेचे ते विद्यमान चेअरमन आहेत, नगर शहरामध्ये पृथ्वी ॲग्रो सर्व्हिसेस या नावाने त्यांनी १९९० साली कृषी व्यवसायामध्ये पाऊल ठेवले व आज ते नावारुपाला आणले आहे. कृषी व्यवसायाच्या माध्यमातुन ते गेल्या अनेक वर्षा पासुन शेतकऱ्यांना कृषी विषयक योग्य सल्ला व मार्गदर्शन देण्याचे काम करीत आहेत. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

श्री. हराळ यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अ.नगर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष ज्येष्ठ मार्गदर्शक सजंय बोरा, विवेक कासार, सुनिल मुनोत, रावसाहेब कांगुणे, आबासाहेब भोकरे, रमेश खिलारी, मनोज गुगळे, संतोष तक्के, विक्रम गदादे, ज्ञानेश्वर शिंदे, संग्राम पवार, दिलीप रोकडे, प्रविण सावंत, सागर कवडे, पवन गांधी, उदय शिंदे, चंद्रकांत उंडे, अमित कासार, सुनिल नवले, सुनिल ढवळे, राहुल निचित, अरविंद बावके, राहुल उंडे यांनी अभिनंदन केले. समेकरीता जिल्ह्यातील सचिन वरखडे, योगेश सोनवणे, सागर कदम, धनंजय जोशी, विजय गांधी, दिलीप कोकणे, सचिन वने, रविंद्र गुंजाळ, बच्चू गांधी, बाबासाहेब भोसले, सुधीर परंडवाल, शरद पवार, उपमन्यु शिंदे व जिल्ह्यातील सभासद हजर होते.

शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत नगरच्या अनन्य, सलोनीला सुवर्ण, रुद्रला रौप्य पदक

नगर – शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत अहमदनगर जिल्हा तायक्कांदो असोसिएशनच्या खेळाडूंनी यावर्षीही चमकदार कामगिरी करत दोन सुवर्ण व एक रौप्य पदक पटकावित आहे. या स्पर्धा विदिशा (मध्य प्रदेश) येथे पार पडल्या.

भारतीय स्कूल गेम फेडरेशन (एसजीएफआय) व मध्य प्रदेश शालेय मंत्रालयाच्या मान्यतेने व तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया (टीएफआय) याच्यातर्फे आयोजित ६८ व्या शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत अहमदनगर जिल्हा तायक्कांदो असोसिएशनचे खेळाडू सलोनी उमेश प्रसाद व अनन्य अच्युतराव रणसिंग यांनी सुवर्ण पदक पटकाविले आहे, तर रुद्र नरेंद्र उडता याने रौप्य पदक पटकाविले आहे. या खेळाडूंनी पुण्यात आयोजित राज्य स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावीत राज्याच्या संघात स्थान मिळविले होते. ८ ते १२ दरम्यान विदिशा (मध्य प्रदेश) येथे पार पडलेल्या शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत सलोनी प्रसादने अंतिम सामन्यात उत्तरा खंडच्या खेळाडूवर ८–६, ६–३ गुणांनी विजय मिळवत सुवर्ण पदक मिळविले. अनन्य रणसिंग हिने अंतिम सामन्यात दिल्लीच्या खेळाडूवर ७–९, ११–५ व ९–८ गुणांनी विजय मिळविला. रुद्र उडताला अंतिम सामन्यात आसामच्या मुलाकडून तीन गुणांनी पराभव पत्करावा लागला. सलोनी प्रसाद व अनन्य रणसिंग या दोघी केडगाव येथील खेळाडू असून, त्या कारमेल कॉन्वेंट इंग्लिश स्कूलमध्ये शिकत आहेत. त्यांना रवी यादव व गणेश धीवर, विशाल जंजाळ, रुद्र उडताला लक्ष्मण शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंचे राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष डॉ. एकनाथ मुंढे, सचिव संतोष बारगजे, सहसचिव अलताफ कडकाले, शकील सय्यद, अंबादास साठे, सुरेश बाघ, सचिन आगळे, दिनेशसिंग राजपूत, गोरक्नाथ गालम, महेश मुरादे, लक्ष्मण शिंदे, रवी यादव, बाबासाहेब क्षीरसागर, प्रभाकर शेळके, अमोल बोधक आदींनी अभिनंदन केले. अनन्य रणसिंगने मागील वर्षीही शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकण्याची कामगिरी केली होती. याही वर्षी तिने सुवर्ण जिंकले आहे. तसेत, रुद्र उडता याने पहिल्याच वर्षी रौप्य पदापर्यंत झेप घेतली आहे. त्यानेही चांगल्या खेळाचे प्रदर्शन करत महाराष्ट्रासह जिल्हा संघटनेला रौप्य पदक मिळवून दिले आहे. विदिशा (मध्य प्रदेश) येथील शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत सुवर्ण, रौप्य पदक विजेत्या खेळाडूंसमवेत प्रशिक्षक लक्ष्मण शिंदे, रवी यादव, गणेश धीवर आदी उपस्थित होते.

विदिशा (मध्य प्रदेश) येथील शालेय राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत सुवर्ण, रौप्य पदक विजेत्या खेळाडूंसमवेत प्रशिक्षक लक्ष्मण शिंदे, रवी यादव, गणेश धीवर.

'राष्ट्रीय सावित्रीबाई फुले फेलोशिप' कवयित्री सरोज आल्हाट यांना जाहीर

नगर – येथील कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या सरोज आल्हाट यांना भारतीय दलित साहित्य अकादमीच्या वतीने देण्यात येणारी राष्ट्रीय सावित्रीबाई फुले राष्ट्रीय फेलोशिप जाहीर झाली आहे.

भारतीय दलित साहित्य अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सोहनपाल सुमनाक्षर यांनी याबाबत पत्राद्वारे कवयित्री सरोज आल्हाट यांना कळविले आहे. सदर फेलोशिप वितरण कार्यक्रम ८ डिसेंबर रोजी दिल्ली येथील पंचशील आश्रम, रिंग रोड येथे होणाऱ्या ४० व्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात ही फेलोशिप सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार.

कवयित्री सरोज आल्हाट या महाराष्ट्रातील कवयित्री असून मुक्त पत्रकार म्हणूनही त्या कार्यरत आहेत. त्यांचे ४ काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून त्यांना साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल अनेक पुरस्काराने यापूर्वी गौरविण्यात आले आहे.

सरोज आल्हाट या गेल्या २५ वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक, साहित्यिक व पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. वयाच्या दहाव्या वर्षापासूनच काव्य लेखन करीत असून त्यांचे अश्रूंच्या पाऊलखुणा, सखे, कविता तुझ्या नि माझ्या, अनन्यता असे ४ काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. अनेक ग्रंझ्यी व मराठी मासिकांचे त्यांनी संपादन केले असून मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांमध्येही त्यांच्या लेख व कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

माऊंट सिनायमध्ये बालदिन वचन दिन म्हणून साजरा

सारोळाबद्दी येथील माऊंट सिनायमध्ये कॉन्व्हेंट स्कूलमध्ये बालदिन वचनदिन म्हणून साजरा करताना विद्यार्थी–विद्यार्थिनी. समवेत शिक्षक व शिक्षिका.

नगर – सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलमध्ये भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विधी शेळके, दक्ष अंकुश, साक्षी म्हस्के, चैतन्य अवारे व जॉय साळवे यांनी समयोचीत भाषणे केली. त्याचप्रमाणे विद्यालयातील शिक्षिकांनी समाज माध्यमाचे दुष्परिणाम यावर आधारित नाटिका सादर करुन समाज माध्यमापासून दुर रहाण्याचे आवाहन केले. बाल दिनाचे औचित्य साधून विद्यानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत विद्यार्थ्यांच्या पालकांनी मतदान करावे यासाठीचे वचन विद्यार्थ्यांकडून लिहून घेतले. हे लिहिलेले वचन विद्यार्थी आपल्या पालकांना देऊन त्यांच्याकडून निर्भयपणे मतदान करण्याचे वचन घेणार आहेत.

सूत्रसंचालन गौरी शेळाके हिने केले तर आभार वेदांत जगताप याने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वर्गशिक्षिका अश्विनी कोरडे, पर्यवेक्षिका नेहा केदारे, सविता पाटोळे, उज्वला पंडित, रेणुका बानिया, कविता आढाव प्रिती कांबळे यांनी प्रयत्न केले.

श्री श्री रविशंकर आर्ट ऑफ लिव्हिंग अहिल्यानगरच्या वतीने शहरात चार दिवस मतदार जनजागृती अभियानाचा शुभारंभ

लोकशाहीच्या उत्सवामध्ये सर्व नागरिकांनी १०० % मतदान करावे : आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सलिल पुळेकर

श्री श्री रविशंकर यांच्या प्रेरणेने आर्ट ऑफ लिव्हिंग अहिल्यानगर शाखेच्या वतीने शहरात चार दिवस मतदार जागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

नगर – राज्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होत असल्याने त्यासाठी मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती व्हावी या साठीच श्री श्री रविशंकर यांच्या प्रेरणेने आर्ट ऑफ लिव्हिंग अहिल्यानगर शाखेच्या वतीने शहरात चार दिवस मतदार जागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा शुभारंभ पाईपलाईन रोड येथे बंगलोर येथील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सलील पुळेकर यांच्या हस्ते झाला. यावेळी अहिल्यानगर शाखेच्या प्रशिक्षक समन्वयक डॉ. सुपर्णा देशमुख, राजेंद्र पाचे, चंद्रकांत तागड, भूषण मालू, नरेंद्र बोठे आदींसह सर्व पदाधिकारी उपस्थित होते

यावेळी बोलताना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सलिल पुळेकर म्हणाले कि मतदान प्रक्रिया म्हणजे लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव असतो. याभव्य आपण सर्वांनी सहभागी होऊन १००% मतदान कसे होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यासाठी सर्व नागरिकांनी या मतदार जागृती अभियानामध्ये सहभागी होणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले.

नगर शाखेच्या समन्वयक डॉ. सुपर्णा देशमुख म्हणाल्या कि श्री श्री रविशंकर यांच्याप्रेरणेने देशात सर्वच ठिकाणी हे मतदार जागृती अभियान राबविण्यात येत आहे. तसेच नगर शाखेच्या वतीने १५ नोव्हेंबर रोजी सांयकाळी ६.३० वाजता टिळक रोडवरील नंदनवन लॉन येथे आपले भविष्य आपले अधिकार या विषयावर प्रभावी सवंदाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दीपसंध्या या भक्ती गीते व देशभक्तीपर गीतांची सुरेल मैफिलचे आयोजन केले आहे यावेळी या कार्यक्रमास बंगलोर येथील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सलील पुळेकर उपस्थित राहणार आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

प्रास्तविकात राजेंद्र पाचे म्हणाले कि आमचे मतदार जागृती अभियान हे १५ नोव्हेंबरपर्यंत सुरु राहणार असून टू व्हीलर मोटारसायकल वरून शहराच्या विविध भागामध्ये जाऊन आमचे सदस्य मतदारामध्ये जाऊन मतदार जागृतीचे काम करणार आहे यावेळी हातामध्ये फलक घेऊन, घोषणाबाजीने परिसर गजबजून जात आहे.

कार्यक्रमास जिल्हा प्रशासन आणि पोलिस विभाग यांचे सहकार्य मिळत आहे. सूत्रसंचालन चंद्रकांत तागड यांनी केले तर आभार भूषण मालू यांनी मानले.

विश्वभारती अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. दिया काळे हिची भारतीय टेनिस बॉल स्पर्धेमध्ये निवड झाल्याबद्दल तीचा सत्कार करताना प्राचार्या वैशाली धोंगडे इतर प्राध्यापक वर्ग.

विश्वभारती अभियांत्रिकी महाविद्यालयाची कु. दिया काळे हिची भारतीय संघात निवड

नगर – विश्वभारती अभियांत्रिकी महाविद्यालय अहमदनगर महाविद्यालयाची प्रथम वर्ष तंत्रनिकेतनची विद्यार्थीनी कु. दिया अविनाश काळे या विद्यार्थीनीने १७ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत सोनीपध हरीयाना येथे आयोजीत केलेल्या १७ वर्ष खालील राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करत सुवर्णपदक पटकावले.

या स्पर्धेत चांगली कामगिरी केल्यामुळे कु. दिया अविनाश काळे या विद्यार्थीनीची ९.१२.२०२४ ते २.०१.२०२५ या कालावधीत पोखरा, (नेपाळ) येथे आयोजीत केलेल्या दक्षिण अशियाई आंतरराष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघामध्ये निवड झाली आहे.

या विद्यार्थीनीने यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. वैशाली धोंगडे यांनी कु. दिया काळे हिचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच सदर विद्यार्थिनीचा महाविद्यालयाचे शैक्षणिक विभाग प्रमुख साखरवडे रूपाली यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. वैशाली धोंगडे, प्रा. रूपाली साखरवडे, प्रा. बाबासाहेब हजारे, शारिरीक शिक्षण संचालक प्रा. ऋषीकेश भालसिंग हजर होते.

या विद्यार्थीनीस महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण संचालक प्रा. ऋषीकेश भालसिंग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून महाविद्यालयास देश पातळीवर मोठा नावलौकीक मिळवून दिल्याचे महाविद्यालाच्या प्राचार्या प्रा. वैशाली धोंगडे यांनी आपले मनोगतातून भावना व्यक्त केल्या.

केडगावमध्ये व्यावसायिकाला लाकडी दांडक्याने मारहाण; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – पोलिसांत केस केल्याच्या रागातून व्यावसायिकाला लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना सोमवारी (दि.११) रात्री नऊच्या सुमारास केडगाव उपनगरातील भूषणनगरमध्ये घडली. मधुर रसिकलाल बोकरिया (वय ३५, रा. अंबिकानगर, केडगाव) असे मारहाण झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संजय लक्ष्मण चत्तर (रा. भूषणनगर, केडगाव) याच्याविरूद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी सोमवारी रात्री नऊच्या सुमारास भूषणनगर येथील पियुष बाफना यांच्या किराणा दुकानात असताना संजय चत्तर तेथे आला. त्याने 'तू माझ्या विरूद्ध केस करतो का' असे म्हणून फिर्यादीला लाकडी दांडक्याने मारहाण केली. शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार गाजरे करत आहेत.

स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकीय आणि शैक्षणिक धोरणाला आकार देण्यात मौलाना आझाद यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली : प्रा. डॉ. सलाम सर

नगर – मौलाना आझाद एक कवी, लेखक, पत्रकार, अरबी आणि फारसीचे विद्वान, इस्लामचे विचारक, एक विचारवंत, एक राजकारणी, एक उत्कृष्ट वक्ते होते. देशाची स्वातंत्र्य चळवळ स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकीय आणि शैक्षणिक धोरणाला आकार देण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली आणि त्यांच्या कार्यकाळात त्यांनी शैक्षणिक रचनेचा असा भक्कम पाया उपलब्ध करून दिला, ज्याच्या आधारे आज ही शैक्षणिक क्रांती अस्तित्वात आली, असे प्रतिपादन मोहंमदिया एज्युकेशन अंण्ड वेल्फेअर सोसायटीचे व्यवस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. अब्दुल सलाम यांनी केले.

मुकुंदनगर येथील मोहंमदिया एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दु प्राथमिक कन्या शाळा, मौलाना आझाद उर्दु मुलींचे हायस्कुल, मदर तेरेसा उर्दु ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अंण्ड सायन्स फॉर गर्ल्स, मासुमिया डी.एल. एड्.कॉलेज (उर्दु)व मासुमिया शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बाबळे कॉलनी, मुकुंदनगर, अहमदनगर येथे स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्या फरहाना सय्यद, मुख्याध्यापक नौशाद सैय्यद, हसीब शेख, असलम पटेल, अंजुम खान आदी उपस्थित होते.

मोहंमदिया एज्युकेशन सोसायटीत मौलाना आझाद यांच्या प्रतिमेला सावित्रीबाई फुले उर्दु प्राथमिक कन्या शाळेत अभिवादन करताना सोसायटीचे व्यवस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ. अब्दुल सलाम सर. समवेत प्राचार्या फरहाना सय्यद, मुख्याध्यापक नौशाद सय्यद आदी.

पुढे बोलतांना सलाम सर म्हणाले की मौलाना आझाद यांच्या विधायक सेवा कौतुकास पात्र आहेत.स्वतंत्र भारताच्या उज्ज्वल भविष्याविषी विज्ञान, तंत्रज्ञान आणि वैद्यकीय विज्ञान शिक्षणाविषी सर्वोत्तम संस्था स्थापन करण्यात त्यांनी आपली प्रचंड प्रतिभा दाखवली. शिक्षण क्षेत्रात आपण पाहत असलेल्या सर्व घडामोडींचा पाया इमाम–उल–हिंद मौलाना अबुल कलाम आझाद यांनी घातला होता असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजुम खान यांनी केले. तर आभार असलम पटेल यांनी मानले.

स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त निमगाव काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अनिताताई काळे

नगर – स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर सातव्या काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ जानेवारी रोजी होणाऱ्या या काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मिरजाबाग जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका तथा मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिताताई काळे यांची निवड करण्यात आली आहे.

अनिताताई काळे यांचे शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात योगदान असून, त्या कवियत्री म्हणून देखील त्यांच्या काव्य संग्रह प्रकाशित झालेले आहेत. साहित्य क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांची काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती काव्य संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी काळे यांची निवड झाल्याबद्दल संमेलनाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवियत्री सरोज आल्हाट, कवी गितारामा नरवडे, गझलकार रज्जाक शेख, माजी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सुभाष सोनवणे, कवी आनंदा साळवे, प्रा. शंकरराव चव्हाण, प्राचार्या गुंफाताई कोकाटे, मिराबक्ष शेख, ज्ञानदेव पांडुळे, हेमलता गिते, सिमा गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे.

काव्य संमेलन यशस्वी होण्यासाठी युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, सचिव प्रतिभा डोंगरे–खोडदे, सचिन जाधव, गौतम फलके, अक्षय ठाणगे, ऋषीकेश बोडखे, छाया वाबळे, कांता वाबळे, किरण ठाणगे, देविदास आंबेकर, प्रियंका डोंगरे–ठाणगे परिश्रम घेत आहे.

नगरमध्ये १५ नोव्हेंबर रोजी मोफत मोतिबिंदु तपासणी व मोफत शस्त्रक्रिया शिबीर

नगर – स्व. सुंदरबाई कन्हैयालाल शिंगवी सेवा भावी प्रतिष्ठान व आदर्शऋषिजी म.सा. यांच्या आशिर्वादाने १९८४ मध्ये अर्चनाश्रीजी म.सा. यांच्या चातुर्मासमध्ये त्यांच्या संकल्पनेतुन संस्थेचे अध्यक्ष अशोक शिंगवी यांनी जैन श्रावक संघ जामखेड व जेसीज क्लब यांच्या संयुक्त विद्यामाने मोफत मोतिबिंदु तपासणी व मोफत शस्त्रक्रिया शिबिराने सुरुवात केली व अखंडित सुरु आहे. या निमित्त १५ नोव्हेंबर वेळ सकाळी १० ते २ वाजेपर्यंत शिंगवी चष्मापर व आनंदऋषीजी नेत्रालय अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यामाने मोफत मोतिबिंदु तपासणी व अल्पदरात फक्त रुपये २२२२/– मध्ये लेन्स टाकून मोतिबिंदु शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले आहे.

शिंगवी चष्मापरमध्ये उपलब्ध सुविधा :– १) नंबरचे चष्मे व्यरीत मिळतील. २) उन्हाव्यावकरीता सन गॉगल्स ३) कॉम्प्युटरव्यरे नेत्र तपासणी ४) बिनटाक्याची मोतिबिंदु शस्त्रक्रिया (अल्पदरात) ५) चष्म्याचे नंबर कमी करण्याचे ऑपरेशन (रेडिअल केरॅटोटॉमी) (अल्पदरात) ६) काचबिंदु शस्त्रक्रिया (अल्पदरात) ७) तिरळेपणावरील शस्त्रक्रिया (अल्पदरात) हे सर्व अल्पदरात तज्ञ डॉक्टरांकडुन तपासणी केली जाईल.

शिबिरातील पेशंटकरीता उपलब्ध सुविधा :– मोफत ऑपरेशन करुन लेन्स अल्पदरात बसवण्यात येईल, ऑपरेशन केलेल्या रुग्णांची तपासणी नेत्रतज्ञामार्फत केली जाईल, मोफत औषधोपचार, काळा चष्मा, राहण्याची व जेवणाची सोय, जामखेड ते नगर येण्याजाण्याची मोफत सोय, आघारकार्ड व कुपन झेरॉक्स सोबत घेऊन येणे. चालु मेडिसिन औषधे व गोळ्या बरोबर आणाव्यात.

नगर नोंदणी आवश्यक. शिंगवी चष्मापर, जुना कापड बाजार मो.नं.९२८४०५८८५९. शिंगवी चष्मापर, मेन रोड, जामखेड मो.नं. ९२२६१२२०६१.

मैदानातून घडलेली मुले जीवनात प्रगती साधतात

कर्नल बिजॉय आर यांचे प्रतिपादन; वाडियापार्क क्रीडा संकुलमध्ये आंतरशालेय मुला–मुलींच्या फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन

नगर – मैदानी खेळातून सुदृढ पिढी निर्माण होणार आहे. मैदानातून घडलेली मुले जीवनात प्रगती साधतात. विद्यार्थ्यांनी फक्त पुस्तकी ज्ञानात न गुंतता मैदानात उतरण्याचे आवाहन एमआयआरसीचे कर्नल बिजॉय आर. (सेना मोडल) यांनी केले.

युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय (भारत सरकार) आणि राष्ट्रीय खेळ संवर्धन संस्था (एनएसपीओ) यांच्या मान्यतेने स्टेअर्स फाउंडेशन व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यामाने वाडियापार्क क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतर शालेय मुला–मुलींच्या फुटबॉल स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी एमआयआरसीचे कर्नल बिजॉय आर बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कर्नल कर्नल नसिर ध्रुव, डॉ. प्रशांत पटारे, एन.एफ.सी. फुटबॉल क्लबच्या अध्यक्षा नमिता फिरोदिया, ऑक्सिलियम कॉन्व्हेंट स्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर नीलिमा, गुलमोहर स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष तथा उद्योजक जोएब खान, स्टेअर्स फाउंडेशनचे अध्यक्ष विजय कमलनाथ (टायरवाले), उपाध्यक्ष डॉ. प्रताप पटारे, विल्सॅट मिलिन्स, सचिव प्रसाद पाटोळे, सहसचिव सुभाष कणोजिया, खजिनदार मयूर टेमक, निलेश हराळे, वृषाली पटेकर, जावेद शेख आदींसह खेळाडू उपस्थित होते.

युवा कर्नल बिजॉय आर म्हणाले की, जगात सर्वोत्कृष्ट खेळ म्हणून फुटबॉलकडे पाहिले जाते. आपण स्वत: फुटबॉलच्या मैदानातून पुढे आलो असून, विद्यार्थी दशेत फुटबॉल खेळलाना स्ट्राघरकची भूमिका पार पाडल्याचे सांगून त्यांनी खेळाच्या मैदानातील जुन्या आठवणींना उजाळा दिला.

वाडियापार्क क्रीडा संकुलमध्ये आंतरशालेय मुला–मुलींच्या फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना एमआयआरसीचे कर्नल बिजॉय आर (सेना मेडल). समवेत कर्नलनसिर ध्रुव, इतर प्रमुख पाहुणे. दुसऱ्या छायाचित्रात प्रमुख पाहुण्यांनी मशाल प्रज्वलित करून खेळाडूंना मैदानात मैदानात स्पर्धेचा ध्वज प्रदान करण्यात आला.

नमिता फिरोदिया म्हणाल्या की, स्पर्धेतून कौशल्य दाखविण्याची संधी मिळते. खेळाडूंनी आपले उत्कृष्ट खेळाचे कौशल्य दाखवावे, या स्पर्धेतून खेळाडूची जिल्हा संघात निवड होणार आहे. नगर शहर हे फुटबॉल खेळाचे माहेरघर असून, उत्कृष्ट खेळाडू पुढे येत आहे. तर अशा स्पर्धेतून खेळाडूंचा चालना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

सिस्टर नीलिमा यांनी फुटबॉल स्पर्धेच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक करुन, हारणाऱे एकदा प्रयत्नाने नक्की जिंकतात, सातत्य ठेवा मैदानात आपले उत्कृष्ट दाखवावे खेळाडूना आवाहन केले. डॉ. प्रताप पटारे यांनी खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी क्रीडा शिक्षक भीम पवार, मनीष राठोड, अक्षय नायडू, आशिष गिंगारदेवे, संदीप दरंदले, वृषाली पटेकर, सौरभ सानप, सोनाली साबळे, सुभाष कणोजिया, मयूर टेमक, प्रसाद पाटोळे आदी उपस्थित होते.

स्पर्धेच्या प्रारंभी मशाल प्रज्वलित करुन खेळाडूंनी मैदानातून संचलन केले व पाहुण्यांकडे मशाल प्रदान करुन स्पर्धेची सुरुवात केली. यावेळी खेळाडूंना प्रातिनिधिक स्वरुपात स्पर्धेचा ध्वज प्रदान करण्यात आला. मैदानाचे पूजन करुन फुटबॉलला किक मारुन पाहुण्यांच्या उपस्थितीत या स्पर्धेला १३ नोव्हेंबरला प्रारंभ झाले. चार दिवस वाडियापार्कच्या मैदानावर फुटबॉलचा थरार रंगणार असून, या स्पर्धेत १५ शालेय संघांनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये १४ व १७ वर्ष आतील मुले व सतरा वर्षातील मुलींचे फुटबॉल सामने नॉक आऊट पध्दतीने रंगणार आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना शनिवारी (दि.१५ नोव्हेंबर) होणार आहे. स्पर्धेचे पंच म्हणून सागर चेमटे, शशी गायकवाड, जोएल पिल्ले, ओम दंडवते, परेश म्याना, प्रणव पंडित, ऋषी कणोजिया काम पाहत आहे. सूत्रसंचालन स्पेश पसपुल यांनी केले. आभार विल्सॅट फिलिप्स यांनी मानले.

पौर्णिमेनिमित्त विजय शंकर मंदिरात १५ नोव्हेंबर रोजी 'कार्तिकस्वामी दर्शन'

नगर – १५ नोव्हेंबर रोजी पहाटे तीन वाजेपासून १६ नोव्हेंबर पहाटे पर्यंत कार्तिक स्वामींचे दर्शनासाठी मंदिर खुले आहे.यावेळी दीपोत्सवही साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती जनरल पोस्ट ऑफिस समोरील श्री विजय शंकर मंदिराचे पुजारी राजेंद्र राजमाने यांनी दिली.

कार्तिक स्वामींचे दर्शन वर्षातून एकाच दिवशी कार्तिकी पौर्णिमेला घेता येते. महिला भाविकांनाही ही संधी मिळत असल्याने या दिवशी आवर्जून कार्तिक स्वामींच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, कार्तिकी पौर्णिमेनिमित्त मंदिरात कार्तिक स्वामी जयंतनिमित्त आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे.

नगरच्या वेतन लेख कार्यालयाच्यावतीने २१ नोव्हेंबरला स्पर्श जागरूकता व जीवन प्रमाणपत्र मेळाव्याचे आयोजन

नगर – अहिल्यानगरच्या स्टेट बँक चौकातील वेतन लेखा कार्यालयात २१ नोव्हेंबर रोजी संरक्षण खात्यातील पेन्शनर कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन बाबत स्पर्श व डिजिटल जीवन प्रमाणपत्र जागृती व्हावी या साठी पुणे थेलीच रक्षा लेखा प्रधान नियंत्रक (सेना) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयाच्या आवारात एक दिवसीय स्पर्श आऊटरीच मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे याचा संरक्षण खात्यातील निवृत्ती वेतनधारक व कौटुंबिक वेतन धारक या सर्वांनी लाभ घ्यावी असे आवाहन या कार्यालयाकडून करण्यात आले आहे. भारत सरकारच्या व पेन्शनर व पेन्शनर्स कल्याण विभागाच्या वतीने १ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत राष्ट्रव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहीम ३.० चे आयोजन करण्यात आलेले आहे. याद्वारे सर्व निवृत्त पेन्शनर्स पर्यंत पोहोचणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट असून यातून 'फेस ऑथेन्टिकेशन टेक्निक' व 'डिजिटल जीवन प्रमाणपत्र' यांचा उपयोग अधिकाधिक वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे.

या मेळाव्यास उपस्थित राहताना सर्वांनी आपला स्पर्श शी संलग्न केलेला मोबाईल क्रमांक, स्पर्श पीपीओ व आधार कार्ड आदी सोबत ठेवावेत. यात ओळखपत्र, प्रोफाईल सेवा अनुरोध, मृत्यू रिपोर्ट, कुटुंबिक निवृत्ती वेतन आरंभ करणे तसेच पेन्शन संबंधी सर्व कार्य व समस्यांचे निराकरण केले जाणार असल्याचे या कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसी अन्वये कळविण्यात येते की, खालील परिशिष्टमध्ये नमूद केलेली मिळकत **श्री. पियुष रतीलाल कटारिया व र. श्री. मिताक्षी रतीलाल कटारिया, दोघे रा. आनंदनगर, ररेडमगरोड, अहमदनगर** यांच्या वरील कर्जदारांनी महीनाभरी आधी. सदरच्या मिळकतीवर विद्यामान मालकांनी आमचे अशिलास विकण्याबाबत बोलणी केलेली असून साठेकरावर विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल लवकरच खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निर्जीवमी व बिनबोजवी असल्याची खात्री व हमी विद्यामान मालक यांनी आमचे अशिलास दिलेली आहे. सदर मिळकतीवर बक्षस बोणत्याही साठेखत, गहाण, दान, इनमेंट, वारसा, कर्ज, बक्षीस, दावा, कोर्ट कार्यवाही अगर इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुरावासह खालील स्वाक्षर प्रसंध आमुन सबखालीच कुलीपत्र बोणणेही बोणणेही हरकत न आल्यास सदरील मिळकत निर्वेध, निर्जीवमी आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन – डिस्ट्रीक्ट अहमदनगर सब डिस्ट्रीक्ट व तालुका नगर येथे चौंदी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील चौंदी सुलताना हायस्कुल जवळील मिळकत या सिटी सर्व्हे नंबर ३८४२/१ या मनपा घर नंबर ५४७५ चे एकुण क्षेत्रफळ ७९.८० चौरस मीटर यापैकी उत्तर बाजुकडील ६३.१६६ चौरस मीटर या एकुण क्षेत्रफळावर बांधलाला आलेला सबलाला बांधकाम ४२.४५ चौरस मीटर, पहीला मजला बांधकाम क्षेत्र ३०.६० चौरस मीटर, दुसरा मजला बांधकाम क्षेत्र ३०.६० चौरस मीटर असे एकुण बांधकाम क्षेत्र १०३.६५ चौरस मीटर ही संपुर्ण मिळकत यासी चर्तुसिमा खालीलप्रमाणे.

पुर्वेस : रस्ता
दक्षिणेस : अपार्टमेंट
पश्चिमेस : चौंदी सुलताना हायस्कुल
उत्तरेस : नोंकाळी जाना व चौंदी सुलताना हायस्कुल

वेगेळप्रमाणे चतु: सिमापुर्वक बांधकामासमवेती वर मिळकत वर्ग वाणगुळीच्या महीनाटीच्या इक्ष व अधिकारासह दरोबस्त तदंगभुत वस्तुसहीत काही एक राखून न ठेवता.

दि. १४/११/२०२४

अॅड. रोहित प्रदीप मंत्री
ऑ. बी/९, अमेय बेंबर्स, जुन्या कोर्टावरुन, कोर्टगल्ली, अहमदनगर. मो. ९८२२३९९४०५

कालिका नागरी सह. पतसंस्था मर्या.,

शहाजी रोड, जि. अहिल्यानगर

स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीर लिलाव

ज्याअर्थी कालिका नागरी सह. पतसंस्था मर्या. शहाजी रोड, अहिल्यानगर यांनी खालील नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखले मिळविले असून त्यावर रितसर मागणी नोटीस, जंगम जप्ती नोटीस व स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम बजावला आहे. तरी थकबाकीदार यांनी थकबाकीची रक्कम भरण्यास सदर केल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९५ (१) व (२) तसेच १९६१ चे नियम १०० (१५) (ई) (ए)(सी)(डी)(इ) (जी) (एच) (जे) नुसार संबंधीत खालील थकबाकीदार मिळकतदारांची स्थावर मिळकत जाहीर लिलावाने विक्रीस काढली आहे. त्या अनुषंगाने सदरची थकबाकीदार यांना थकबाकी भरण्यास नैसर्गिक न्यायतत्वाने संधी देवूनही सदर थकबाकीदार यांची थकबाकी भरण्यास कसूर व टाळाटाळ केली असल्याने सदरच्या जाहीर लिलावाने त्याच्याकडील थकबाकी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६(१) व (२) व १९६१ चे नियम १०० (१५)(इ) व चे उपरोक्त उपनियमानुसार मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी अशोक शिवदास झोटींग, विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील प्रमाणे जाहीर केल्या प्रमाणे मिळकत विक्री करणे तसेच त्या परिस्थितीत स्थावर मालमत्ता थकीत रक्कम वसुली करिता जाहिर लिलावाने विक्री करण्याचे उरविले आहे. तरी जा मालमत्ता लिलावात भाग घेऊन इच्छिणाऱ्यांनी सदरचे खालील नमुद केलेल्या विक्रणी, तारखेवर व वेळेस उपस्थित राहावे.

अ. नं.	थकबाकीदाराचे व जामीनदाराचे नांव व पत्ता	लवाद दाखला रक्कम व तारीख	विक्रीस काढलेल्या मालमत्तेचा तपशील
१	कर्जदार– के. अध्युत पुरुषोत्तम रासने (मयत) म.वा १) मीन. जयश्री अच्युत रासने २) तेजस अच्युत रासने जामीनदार – १. श्री / सौ. चितळे टी.जी जामीनदार – २. श्री / सौ. कदम आर. एस	१०१ दाखला क्रं. ३०३/२०१६–रु दि.१६/०८/२०१७ रु.२८,४७,७४९/– + २०१४/२०१५ पासून १५% प्रमाणे व्याज + इतर खर्च व सरचार्ज	के. अध्युत पुरुषोत्तम रासने (मयत) म. वा. १) श्रीम. जयश्री अच्युत रासने २) तेजस अच्युत रासने यांची जाम मिळकत गोंजे – शाखेची, रासनेनगर, ता.जि. अहिल्यानगर सदर मिळकतीचे क्षेत्रफळ गट नं. ९२/४/१२/५ प्लॉट नं. ९८ या प्लॉटवरील अंकुर अपार्टमेंट मधील फ्लॅट नं. २ व ३ पैकी क्षेत्र ४३.९४ व ५०.५० चौ.मि.

लिलावाचे ठिकाण : **कालिका नागरी सहकारी पतसंस्था मर्या.. अहिल्यानगर**
पत्ता :– संकल्पेचा बोळ, शास गली, शहाजी रोड, अहिल्यानगर
लिलावाची तारीख : ९६ डिसेंबर २०२४ व वेळ : ११.०० वाजता, वार : सोमवार
१) लिलाव होण्यापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव स्थगित केला जाईल.
२) लिलाव करण्याचा किंवा स्थगित देण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
३) लिलावाच्या अटी व शर्ती संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या आहेत.
४) लिलावात भाग घेण्यासाठी रुपये १०,०००/– अनामत रक्कम किमान लिलावाच्या अगोदर १ दिवस भरणे आवश्यक आहे.
५) ज्याच्या नावे लिलाव देण्यात आला त्याने त्याच दिवशी लिलाव रक्कमेच्या २५ टक्के रक्कम भरणे आवश्यक आहे व उर्वरित रक्कम ३० दिवसांच्या आत संस्थेत जमा करण्यात यावी.
६) मिळकतीचे मालकी हक्क, कब्जा व बोजा बाबत लिलाव घेणाऱ्याने पूर्ण खात्री करुन घ्यावी.
७) लिलावास कोणताही बोली भाग घेता येईल परंतु चर्चा अगोदर रक्कम १०,०००/– भरणे अनावश्यक आहे.
सदरचा जाहिरनामा मी माझा सही व कार्यालयीन मुद्रेसह आज जारिच्य केला आहे.
८) सदर लिलावामध्ये ज्या मिळकतीचे लिलावास बोली घाटक मिळणार नाही / नो बिड होईल त्या मिळकतीचे लिलाव ३१/१२/२०२४ व १६/०१/२०२५ या दिवशी सदर मिळकतीचे फेर लिलाव घेण्यात येतील.

तारीख : १४/११/२०२४

अशोक शिवदास झोटींग
विशेष वसुली व विक्री अधिकारी
द्वारा कालिका नागरी सह.पतसंस्था मर्या.,अहमदनगर

देव दिवाळीनिमित्त १५ नोव्हेंबरला नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई

नगर – नवीपेठ, अहिल्यानगर येथील श्रीराम मंदिरात देव दिवाळीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजता आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार असून या देव दिवाळीनिमित्त १११११ दीप प्रज्वलित करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर देवस्थान ट्रस्टच्यावतीने सांगण्यात आले.



श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने वर्षभरात विविध कार्यक्रम साजरे करण्यात येतात तसेच दर शनिवारी भक्तिमावाने हनुमान चालीसा पठाण व भजन संध्या आयोजित करण्यात येत आहे. गेल्या १७ वर्षापासून अविरतपणे ट्रस्टच्या माध्यमातून अनेक धार्मिक उत्सव या मंदिरामध्ये साजरा होत आहेत.

देव दिवाळीनिमित्त श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने मंदिरास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली तसेच १५ नोव्हेंबर रोजी ११११ दीप प्रज्वलित करुन आकर्षक सजावट करण्यात येणार आहे.

या उत्सवात नगर शहरातील भाविक भक्तांनी दर्शनासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

दिनांक : मुव्ही–सो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 07 नोव्हेंबर ते 14 नोव्हेंबर 2024

SINGHAM AGAIN
08:00AM | 11:00AM | 02:00 PM
05:00PM | 05:30PM | 08:00 PM
11:00 PM

BHOOL BHULAIYAA 3
08:00AM | 09:00AM | 10:45 AM
12:00 PM | 01:30 PM | 02:45 PM
04:30 PM | 07:30 PM | 08:30 PM
10:30 PM | 11:15 PM

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow **CONNPLEX** AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

फ्रेश स्टॉक

महावीर मॉल...
स्वस्त परंतु चांगले कपडे खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच कृपया मॉलला भेट द्यावी.

जेन्स–लेडीज स्वेटर, जर्किन, हुडी, अप्पर, मफलर, हँड ग्लोव्ज, उलन कॅप सर्व साईझमध्ये आणि होलसेल दरात...
इंपोर्टेड ब्लँकेट ४०० रु. किलो प्रमाणे

मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.

अधिक माहितीसाठी भेट द्या

श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिर समोर, मर्चंट बँक जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

जाहीर नोटीस

लगाव लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविणे येते की, खालील परिशिष्टमध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार मिळकतीचे विद्यमान मालक संजय गुलाब राऊत व सुनील गुलाब राऊत यांनी आमचे अशिलासबरोबर उपरिलेला आहे व मोठी रक्कम स्वीकारुन नोटरी समक्ष साठेखत लिहून नोंदवून दिलेले आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे खरेदी देणारांचे म्हणणे आहे. परंतु याबाबतीची कोणतीही कसलेच अगर तक्रार यापूर्वी वा यापुढे या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अथवा जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाईहुकूम, स्थगिती, पोटगी, धार्ज, लीन, इनमेंट, इतर कोणताही वारसाही चालू वाद विवाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून घ्यावी. मुदतीत कोणचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा त्याचे काही हक्क हितसंबंध आहे त्यांनी जाणीपत्रुर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल करेदीव्यवहार व्यवहार पुरा करतील. तद्नंतर सर्व कोणचीही कोणतीही हरकत अगर तक्रार चालणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
ही नोटीस प्रसिद्धीस दिली.
तारीख :– १४ / ११ / २०२४
मिळकतीचे वर्णन – जिल्हा तुळजी अहमदनगर, पोटतुकडी २३, सदर मिळकत, महानगरपालिका हद्दीतील मौजे चाहुराणा खु येथील शेतजमीनीचे वर्णन खालील प्रमाणे,

सर्व्हे नंबर	हे. आर.	आकार
	चौ – पैसे	
३३/१ पैकी	०१ – २९ ०० – ०४	०५ – ८१
	०१ – ३३	

वांशी चतु:सीमा –
पुर्वेस : लागू ओढा (चिंगार नाला),
पश्चिमेस : लागू शिव (जूना बुरुडगाव रोड),
दक्षिणेस : याच स. नं. ३३ / १ पैकी येथे निवृत्ती राऊत, खेरे, बाजासुंड किशोर राऊत व मानिक किसन राऊत यांचे क्षेत्र
उत्तरेस : लागू सर्व्हे नंबर ३४ पैकी अंबासरकार यांची शेतजमीन.
यापैकी वर नमुद शेतजमिनीचे उत्तर बाजुच्या शेतजमिनीचे विद्यमान मालक श्री. संजय गुलाब राऊत व श्री. सुनील गुलाब राउत यांच्या हिस्यापी एकुण ०० हे – ६५.५० आर + पोटखराब ०० हे ०२ आर अशी एकुण ०० हे – ६६.५० आर शेतजमीन.

अॅड. बानेश्री जरंडीकर
गुरुकृपा हौसिंग सोसायटी, फिरतबाग, अहमदनगर
मो. नंबर ९८९०३८६३३३

धम्माल मनोरंजन

मनोरंजक शब्दकोडे

आडवे संकेत

१) xxxxxxxxxxx सोडी सोन्याचा पिंजरा.....
९) अशा प्रकाराचा ११) भिक मागणे १२) जात, समुह
१३) मरण्याची अवस्था
१४) आरुढ १६) दुष्ट भाव
२०) समेट
२२) इंजेक्शन
२४) उणीव, न्युनता
२५) वर्णाच्या द्वारे करावयाचे गणित २७) पर्वत
२८) घुस्सा
३०) एक प्रसिद्ध गायिका
३१) गणरायाचे मंडळ
३४) तुरटपणा
३५) खालच्या दर्जाचा
३६) या देशाची राजधानी ताईपे आहे ३८) इच्छा
